शनिवार । ३० जानेवारी १९८२ । एक रुपया

माणूस

संपादक माणूस,

आज सकाळी श्रीमती सुमती देवस्थळे यांच्या अकाली आणि आकस्मिक निधनाची बातमी ऐकली. थोडा वेळ मन सुन्न झाले.

एक संयमी, सुजाण, सौम्य प्रकृतीची, सतत कार्यरत राहणारी, कठीण, क्लिष्ट विषय आणि ज्यांच्याबद्दल गैरसमजही आहेत अशा व्यक्तींकडे 'माणूस' म्हणून बघणारी, अन् तशाच रूपात त्यांना पुस्तकांद्वारे वाचकांसमोर सादर करणारी लेखिका आम्ही गमावली! अशी लेखिका पुनः मिळणं आज तरी दुष्प्राप्य वाटतंय. बघू या!

त्यांच्या स्मृतीस मी आदरांजली वाहते. आपल्याला हे लिहिण्याचे कारण की, त्यांच्या 'टॉलस्टॉय एक माणूस' ह्या ग्रंथाची झलक माणूसमध्ये वाचली अन् सहज अभिप्राय कळवला तर चक्क या थोर लेखिकेने मला पत्रे लिहीली. माझ्याजवळ त्यांच्या घरचा पत्ता आहे पण तो सापडेलच ही खात्री नाही अन् मनाला तेवढा धीर नाही.

जास्त काय लिहू ?

२३।१।८२ **सुमन रानडे, औरंगाबाद**



सुमती देवस्थळे

सुमती देवस्थळे यांनी 'टॉलस्टॉय–एक माणूस' हे चरित्र लिहून मराठी चरित्र-वाङ्मयात एक मौलिक भर घातली. त्यानंतर गेल्या ७-८ वर्षात त्यांनी खूप लिखाण केले. पाश्चिमात्य साहित्यिकांच्या लहानलहान चरित्ररेखा त्यांनी 'माणूस'मधून व इतरत्र सादर केल्या. श्वाइत्झरचे मोठे चरित्र लिहिले. मार्क्सची चरित्रात्मक ओळख करून दिली. लिंकनवर त्या लिहिणार होत्या; पण हा त्यांचा लेखनप्रकल्प पूर्ण होण्याआधीच त्यांचे गेल्या २२ जानेवारीला मुंबई येथे आकस्मिक देहावसान झाले! त्यांची प्रकृती गेल्या ८-१० वर्षे तशी तोळामासाच होती; पण या दुर्बलतेवर मात करून, इतक्या कमी काळात, इतके विपुल चरित्रवाङ्मय त्यांनी लिहिले. त्यातले बरेचसे लक्षवेधीही ठरले. 'टॉलस्टॉय' या पहिल्याच ग्रंथाने वास्तविक त्यांना मानसन्मान मिळवून दिले होते. असे एखादे पुस्तक खूप गाजल्यावर लेखक सुखावतो, विसावतो आणि बरेचदा थांबतो–संपतोही! पण देवस्थळेबाई अशा थांबल्या नाहीत. त्यांचे वाचन-लेखन अखेरपर्यंत चालू होते. किंबहुना त्यांच्या प्रकृतीवरचे ते एक औषधच होते! टॉलस्टॉयचे लेखन-प्रकाशन चालू होते तेव्हा त्या मुंबईतल्या मुंबईतही फारशा हिंडू-फिरू शकत नव्हत्या; पण पुस्तक निघाले, अभिप्राय येऊ लागले आणि त्यांना जणू पुनर्जन्मच लाभला! मिणमिणत असलेली त्यांची जीवनज्योत पुन्हा सतेज झाली. लेखन-वाचन हा त्यांचा केवळ छंद, विरंगुळा उरला नाही, ती त्यांच्या प्रकृतीची गरजच झाली! त्याशिवाय त्यांची साहित्यनिर्मिती एवढा वेग धारण करू शकली नसती.

टॉलस्टॉयमागची त्यांची भूमिका काय होती? हे केवळ एक रूढ चरित्र नाही. चरित्रलेखनाचे एक नवे तंत्र, एक नवी पद्धती आपण मराठीत आणत आहोत, असा देवस्थळेबाईंचा दृष्टिकोन होता. तो मान्यता पावला याचे त्यांना खरे समाधान होते. लेखकाजवळ असा एखादा वेगळेपणाचा, वैशिष्टयपूर्णतेचा आग्रह असावा लागतो. अशी पृथगात्मता असल्याशिवाय सकस व मौलिक लिखाण होऊच शकत नाही! अशी मौलिकता टॉलस्टॉय-चरित्राच्या मांडणीत, भाषेत आपणास सुरुवातीपासूनच जाणवते. हे एकसुरी चरित्र नाही. ते टॉलस्टॉय नामक एका समुद्रात केलेले अवगाहन आहे! या समुद्राचा त्यांनी अगदी तळ गाठल्याचे या ग्रंथात पानोपानी जाणवते. त्याशिवाय अनेक विसंगतींनी, विविधतांनी परिपूर्ण असलेल्या या महामानवाच्या चरित्राची त्या इतकी सुसंगत व आकर्षक मांडणी करूच शकल्या नसत्या! पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर टॉलस्टॉय पुस्तकाची जन्मकथाच देवस्थळेबाईंनी लिहून 'माणूस'कडे पाठवून दिली होती. त्या वेळी ती प्रसिद्ध झाली नाही. परवा देवस्थळेबाई गेल्याचा फोन आल्यावर तिची आठवण झाली. या अंकात ती पुढे दिलीच आहे. लेखक म्हणून आपले निराळेपण, टॉलस्टॉय चरित्रातील वेगळेपण वाचकांच्या ध्यानात आणून देण्याचा त्यांचा हा हळुवारपणे केलेला प्रयत्नच होता. त्या स्वभावाने संकोची होत्या. म्हणून मी-मी करत सभा-परिसंवादातून त्या फारशा बोलताना दिसल्या नाहीत! नको तितके न्यूनत्व त्या स्वतःकडे घेत; पण याचा अर्थ त्यांचा स्वाभिमान, वेगळेपणाची जाणीव कमी प्रखर होती असा नाही. अशी जाणिवेची प्रखरता असल्याशिवाय का 'टॉलस्टॉय–एक माणूस'-सारखा एक अप्रतिम चरित्रग्रंथ निर्माण होत असतो?

**–श्री. ग. मा.**

मुंबई वार्ता

# डोळस अंधत्व

रात्रीचे साडेअकरा ही काही खरं म्हणजे मुलाखत घ्यायची किंवा द्यायची वेळ नाही. कुणाचीच नाही आणि त्यातही 'वक्त-की पाबंदी'चा ख्याल रखनेवाल्या, शिस्तप्रिय पाश्चात्यांची तर नाहीच नाही; पण काय करणार? ताजमहाल हॉटेलमधला एक कार्यक्रम आटोपून परत येताना बाहेरच्या दालनात शेफर पती—पत्नी मला भेटले, तेव्हा रात्रीचे साडेअकरा वाजले होते. लाउंजमध्ये उभ्या असलेल्या वृद्ध आणि अंध श्री. शेफरनी माझं लक्ष आधीच वेधून घेतलं होतं. कुणी तरी सांगितलं, हे अमेरिकन जोडपं आणि विशेषत: अंध असलेले स्वत: शेफर भारत 'बघायला' आले आहेत.

ओळख अर्थातच नाही; पण उत्साहानं ओसंडणाऱ्या या विदेशी जोडप्याशी बोलायची आगळी संधी सोडवेना. तेव्हा सरळ थातुर मातुर ओळख करुन घेतली. दिवसभरच्या स्थलदर्शनानं ते खरं म्हणजे दमले होते; पण मी 'मुलाखत घ्यायची आहे,' असं म्हणताच म्हणाले, 'मग वाट कसली पहातेस शूट! कर सुरू!'

श्रीमती शेफर व्यवसायानं डॉक्टर आहेत आणि श्रीयुत केमिस्ट; पण केमिस्ट आहेत म्हणजे होते. कारण दहा वर्षांपूर्वी त्यांची दृष्टी गेली आणि दृष्टीबरोबरच व्यवसाय! धावपळीचं आणि अर्थपूर्ण जीवनही भूतकाळात जमा झालं. जीवनात काळाकुट्ट अंधार पसरला आणि तोही केवळ लाक्षणिक अर्थाने नव्हे तर अक्षरश:, तशात वयही उतरतं. सत्तरीच्या जवळ आलेल्या शेफरनी परत एकदा ब्रेल लिपीतून ग म भ न गिरवायला सुरुवात केली. एकूणच पाश्चात्य देश आणि त्यातही अमेरिका म्हणजे तिथे माणसाची माणसाला किंमत कमी, आपुलकीची भावना, मायेचा ओलावा थोडा कमीच. कुटुंबसंस्थाही मोडकळीला आलेली, अशी आपली समजूत आहे आणि पुष्कळशा अंशी ती खरीही आहे; पण या शेफर आजोबांना मात्र कुटुंबानं दूर लोटलं नाही. पत्नीनं तर खूपच मदत केली, उत्तेजन दिलं, डोळस उत्तेजन दिलं आणि अमेरिकेच्या भोवळ आणणाऱ्या गतिमान जीवनात शेफर सहजतेनं रुळले. आता ते अन्य धडधाकट लोकांप्रमाणे वावरु शकतात, एकटयानं प्रवास करु शकतात आणि ब्रेल लिपीच्या सहाय्यानं भरपूर वाचनही करतात!

न्यूयॉर्कला राहणारे हे शेफर पती—पत्नी भारतात प्रथमच आले आहेत. त्यांना भारत बघायचा आहे आणि मुख्य म्हणजे भारतीय बघायचे आहेत. 'बघण्या'ची त्यांची तऱ्हा काही आगळीच आहे. जवळजवळ संपूर्ण भारताबद्दल पुस्तकांमधून, एनसायक्लोपीडीमधून त्यांनी माहिती मिळवली आहे. प्रत्यक्ष स्थळाचं दृश्यवर्णन श्रीमती शेफर करतात. ते ठिकाण त्या 'मोठयानं'—'लाउडली'—बघतात, त्याच्या साऱ्या बारीकसारीक तपशीलासह बघतात आणि मग श्री. शेफरना ते ठिकाण 'जाणवतं, भावतं.' त्या ठिकाणाचा त्यांना 'फील' येतो आणि कुठल्याही डोळस माणसानं घ्यावा, तेवढयाच उत्कटतेने त्यांनाही त्या ठिकाणचा आस्वाद घेता येतो. त्यांच्या या खास पद्धतीनं त्यांना ताजमहालाचं सौन्दर्य कळलं आहे, कुतुबमीनारची उंची जाणवली आहे, गेट वे ऑफ इंडियाहून दिसणाऱ्या समुद्राचा अथांगपणा त्यांना माहीत झाला आहे.

एखादी शक्ती कमी झाली, की निसर्ग ती उणीव दुसऱ्या कशानं तरी भरून काढतो असं म्हणतात. शेफरना डोळे नाहीत खरे; पण अगदी परभाषेत बोलणाऱ्या माणसाशीही संवाद साधण्याची अजब कला त्यांच्यापाशी आहे. दुसऱ्याच्या हृदयाचा वेध घ्यायला त्यांना नजरेची गरज लागत नाही. संवादातून आणि डोळस संवेदनक्षमतेनं त्यांना भारताबद्दल पुष्कळ काही कळलं आहे. इथल्या जीवनाचा संथपणा, दारिद्र्यानं झाकोळलेलं पण माणुसकीची चाड असलेलं जीवन जाणवलं आहे. तग धरून असलेल्या आणि भावनिक आधार देणाऱ्या, इथल्या कुटुंबव्यवस्थाच्या परंपरा त्यांना विशेष भिडल्या. भारतात वृद्धाची रवानगी सरसकट वृद्धाश्रमात केली जात नाही आणि कुटुंबामधून त्याचा प्रेमानं आणि आदरानं स्वीकार केला जातो, हे त्यांना अनोखं वाटलं. अमेरिकेसारख्या देशात तर हे प्रश्न अधिकच बिकट आहेत. संपन्न आणि समृद्ध जीवनामुळे माणसाची सामान्य आयुर्मर्यादा वाढते आहे. उतारवयातही प्रकृती धडधाकट असताना, जगण्याची उमेद कायम असतानाही सक्तीची निवृत्ती पत्करावी लागणं ही वैभवानेच केलेली क्रूर थट्टा आहे. त्यामुळेच वृद्धाच्यासुद्धा जीवनोर्मीला मुक्त वाव देणारी भारतीय समाजपद्धती त्यांना जास्त पसंत पडली.

नुकतंच आतरराष्ट्रीय अपंगवर्ष साजरं झाल, त्या संदर्भात बोलताना शेफर म्हणाले की, अपगामधलाही माणूस जागा करणं, त्याना माणसाच्या सन्मानानं वागवणं ही अपंगाची अतिशय महत्त्वाची गरज आहे. 'अजून यौवनात मी' अशी उमेद माझ्यामध्ये असताना परिस्थितीनं भाजीपाल्याचं आयुष्य माझ्या-


## साप्ताहिक माणूस

वर्ष : एकविसावे
अंक : पस्तिसावा
३० जानेवारी १९८२
किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

वर लादलं; पण मी त्याला दाद देणार नाही! आमच्या या अशा समस्यांकडे या निमित्तानं लक्ष वेधलं गेलं, हे उत्तम झालं.

श्री. शेफरची ही जीवनाकडे बघण्याची दृष्टी, सार्थ आयुष्य जगण्याची धडपड आणि भारताबद्दलचे त्याचे विचार हा साराच एक सुखद अनुभव होता !

¤

## तुझी इयत्ता कंची ?

नामदेव ढसाळांच्या 'तुझी इयत्ता कंची. तुझी इयत्ता' या चौथ्या काव्यसंग्रहाचा प्रकाशनसमारंभ नुकताच मुंबईत पार पडला. समारंभाला राजा ढाले, दिनकर साक्रीकर, प्र. श्री. नेरूरकर, केशव मेश्राम इत्यादी दलित साहित्यिक आणि साहित्यप्रेमींनी भाषणं केली. अध्यक्ष होते माधव मनोहर. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनीनं हा काव्यसंग्रह प्रकाशित केला आहे.

'गोलपीठा'बरोबर सुरू झालेली नामदेव ढसाळांची साहित्यिक कारकीर्द हा साहित्यातला आणि दलित परंपरेतला एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्यामुळे साहित्यिक महत्त्वाबरोबरच ढसाळाच्या कवितेला एक खास असं ऐतिहासिक स्थानही आहे. कार्यक्रमातल्या सर्व वक्त्यांनी या गोष्टीला उन्मेखून ढसाळांच्या गौरवपर भाषणं केली. या निमित्तानं दलित कवितेच्या इतिहासाचाही थोडा–फार आढावा घेतला गेला. राजा ढाले म्हणाले की, दलित कवी हा कवी–कार्यकर्ता असतो, आणि ढसाळ या परंपरेचे अध्वर्यूच म्हणावे लागतील. तीव्र वर्गजाणीवा आणि ढळढळीत वर्गचरित्र असलेला कवी म्हणजे ढसाळ! त्यांची कविता प्रचलित मूल्यव्यवस्था उध्वस्त करणारी आहे, आणि तिच्या नेमकेपणाबद्दल बोलायचं झालं, तर तिला कुठलेही अंतर्गत पर्याय नाहीत. त्यांची कविता, तिच्यातल्या वेदनेमुळे आणि रसरशीत अभिव्यक्तीमुळे अस्सल वाटते. ढसाळ प्रसिद्धीकरता लिहित नाहीत, अभिव्यक्तीकरता लिहितात, आणि ते जहाल असलं, भयंकर असलं तरी खरं असतं. अगोदर कडाडून हल्ला करणारे नारायण आठवले, ढसाळाच्या कवितेचे नंतर कसे चाहते बनले, हीही आठवण त्यांनी सांगितली.

ढसाळांच्या कवितेचा अर्थ म्हणजे त्या इतिहासाचा अर्थ, असा नेरूरकरांनी गौरव केला, तर विश्वाचे आर्त खऱ्या अर्थानं प्रकाशित झालं ते ढसाळाच्या कवितेत, असं साक्रीकरांनी म्हटलं. दहा–बारा वर्षांपूर्वीची एक आठवण सांगताना मेश्रामांनी म्हटलं, भिवंडी दंगलग्रस्तांच्या मदतीसाठी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या याच सभागृहात कवीसंमेलन भरलं होतं. ढसाळांचं नाव कार्यक्रमपत्रिकेवर नव्हतं, पण त्यांनी चिठ्ठी पाठवून विचारलं, मी एक टॅक्सीड्रायव्हर आहे आणि मला कविता वाचण्याची इच्छा आहे. तेव्हा अध्यक्ष अनंत काणेकरानी त्यांना परवानगी देताना म्हटलं होतं, तुम्ही ड्रायव्हर आहात, तेव्हा बाकी सर्वांच्या पुढेच असायचात तुम्ही ! ढसाळांनीही ते संमेलन चांगलंच गाजवलं आणि तिथून त्यांची प्रकाशात यायला सुरुवात झाली.

ढसाळाचा 'तुझी इयत्ता कंची' हा काव्यसंग्रह, त्यांच्या आजवरच्या कवितेहून थोडा वेगळा आहे. याही कवितांमधून दलितांच्या, समाजाच्या एका उपेक्षित, अभागी घटकाच्या व्यथा तीव्रपणे व्यक्त होतात; पण या कवितांमध्ये केवळ ज्वालाग्राही संताप आणि अन्यायाची चीड नाही, तर थोडी अंतर्मुखता आहे. त्यांना तत्त्वज्ञानाची झाक आहे. माणूस म्हणून येणाऱ्या अटळ आणि अपरिहार्य एकाकीपणाची आणि दु:खाची इथे जाणीव आहे. आजवर न आढळलेलं आत्मभान या कवितांत आहे. या कवितामधला आक्रस्ताळेपणा आणि एकसुरीपणा कमी झालाच. त्यांच्यात विनोद आहे, कडक आत्मपरीक्षण आहे, मृदुता आहे. हा संग्रह जेनी मार्क्स, सावित्रीबाई फुले आणि रमाबाई आंबेडकर अशा तीन स्त्रियांना अर्पण केलेला आहे, इथूनच त्याच्या वेगळेपणाला सुरुवात होते. एकूणच या संग्रहात परिपक्वतेचा प्रत्यय आहे आणि म्हणून तो अधिक वाचनीय आहे.

या समारंभाचं आणखीही एका कारणासाठी कौतुक करायला हवं. यासारख्या बहुतेक कार्यक्रमांच्या नशिबी रिकाम्या खुर्च्या आणि भरलेल्या खुर्च्यांवरचे अनिच्छेनं आलेले लांबट चेहरे असतात. समोर भरलेलं सभागृह हा मान फक्त स्टारवॅल्युवाल्या साहित्यिकांच्या नशिबी असतो; पण या कार्यक्रमाला प्रथितयश अ-दलित साहित्यिक तर उपस्थित होतेच; पण ढसाळांविषयी प्रेम असलेल्या दलित-ललित रसिक-वाचकानी केलेली गर्दीही विलोभनीय होती! अडीच-तीन तास चाललेल्या या कार्यक्रमाची गर्दी प्रतिक्षणी वाढतच होती. श्रोते जाणतेपणाचा आव आणून न बसता मैफलीत बसावं तशा खुल्या दिलानं बसले होते. वाक्या-वाक्याना टाळया मिळत होत्या आणि कुणी वक्त्यानं ढसाळांच्या कवितेच्या ओळी उद्धृत केल्या, तर त्याला अगदी मनमोकळी दाद मिळत होती. एका तरुणानं उत्स्फूर्त भाषण केलं आणि ढसाळाच्या कवितेतला अंगार सौम्य झाल्याबद्दल आपला निषेध नोंदवला. ढसाळांची अंतर्मुखता म्हणजे आत्मसात्वना आहे आणि त्यातला व्यक्तित्ववादी सूर ही भेसळ आहे असे त्याचे आरोप होते.

कार्यक्रमाच्या ओघात या तरुणाकडे अर्थातच दुर्लक्ष झालं; पण ढसाळाची कविता समाजाला किती आपलीशी वाटते, तिच्यात आत्मदर्शनाची केवढी संधी मिळते या साऱ्याचं त्याचं ते भाषण म्हणजे द्योतक होतं! हा संपूर्ण समारंभ म्हणजेच मुळी दलित कवितेच्या प्रत्ययकारितेचं आणि तिच्या यशाचं, तिनं रुजवलेल्या साहित्यकलेच्या आवडीचं एक प्रतीक होतं.

माधव मनोहरानी अध्यक्षीय भाषणात, दलित कवितेचं कौतुक करताना निष्कारण लावला जाणारा अन्य साहित्याच्या उपेक्षेचा आणि मानहानीचा सूर टाळावा असा सावधानीचा इशारा दिला. 'ढसाळांची कविता चांगली आहे' या वाक्याला पूर्वार्ध किंवा उत्तरार्ध म्हणून 'कोण कुठला तुकाराम, केशवसुत ?' किंवा 'मर्ढेकरांना याच्या नखाची तरी सर येईल का ?' असं कशाला ?

माधव मनोहरांच्या भाषणातल्या समतोलपणानं आणि त्यानी करून दिलेल्या सामाजिक-साहित्यिक बांधिलकीच्या जाणिवेनं साहित्य समेलनातल्या गं. बा. सरदाराच्या वक्तव्याची परत एकदा आठवण करून दिली!

—ललिता बर्वे

# पोलंड
## दीर्घकालीन लढ्याची तयारी

वा. दा. रानडे

पोलंडमध्ये सॉलिडॅरिटीची चळवळ दडपण्यासाठी लष्करी कायदा गेल्या १३ डिसेंबरला पुकारण्यात आला, त्याला आता दीड महिना होऊन गेला. सॉलिडॅरिटीच्या नेत्यांनी आता दीर्घकाल भूमिगत लढा देण्याची तयारी चालविली आहे. संघटनेचे एक नेते झिगन्यू बुजक भूमिगत झाले आहेत. 'लष्करी हुकुमशाहीचे उच्चाटन करून लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी आम्ही लढा चालू ठेवणार आहोत' असा निर्धार त्यांनी एका मुलाखतीत व्यक्त केला.

बुजक वॉर्सामधील सॉलिडॅरिटीच्या शाखेचे प्रमुख आहेत. लेक वालेसांच्या खालोखाल क्रमांक दोनचा नेता म्हणून ते ओळखले जातात आणि वालेसांच्या स्थानबद्धतेनंतर भूमिगत लढ्याची दीर्घकालीन योजना आखण्याची जबाबदारी आता त्यांच्यावरच आली आहे. अधिकाऱ्यांना त्यांचा ठावठिकाणा लागू नये व ते सापडू नयेत यासाठी अत्यंत सावधगिरी बाळगून ही मुलाखत घेण्यात आली. एक प्रश्नपत्रिका तयार करून एका माणसाकडून दुसऱ्याकडे, त्याच्याकडून तिसऱ्याकडे अशा पद्धतीने त्यांच्यापर्यंत ती पोचविण्यात आली व तशाच पद्धतीने ती परदेशी वार्ताहरांकडे प्रसिद्धीसाठी पाठविण्यात आली.

सॉलिडॅरिटीच्या नेत्यांना अधिक दूरदर्शीपणाने वागून हा संघर्ष टाळता आला नसता का? असा एक प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्याला उत्तर देताना बुजक म्हणतात पाश्चात्य नेत्यांनी असे मत व्यक्त केल्याचे मला माहीत आहे, पण ज्याला ते दूरदर्शीपणा म्हणतात तो दूरदर्शीपणा म्हणजे प्रत्यक्षात सरकारशी व कम्युनिस्ट पक्षअधिकाऱ्यांशी सहकार्यच होते. कामगार, बुद्धिजीवी, कलावंत यांच्या विरुद्धच हे सहकार्य करावे लागले असते आणि लोकशाहीचा केवळ देखावा करून आम्ही हुकुमशाही पद्धतीचाच एक भाग बनलो असतो. सॉलिडॅरिटीकडून ही अपेक्षा नाही!'

सॉलिडॅरिटीचे आंदोलन म्हणजे क्रांती आहे असे अनेकजण मानतात; पण या क्रांतीत हिंसेचा, बळाचा वापर टाळावयाचा हे पथ्य आम्ही पाळीत आहोत. त्यासाठीच कम्युनिस्ट पक्षाची नेतृत्वाची भूमिका मान्य करावयाची, आर्थिक प्रश्नांच्याबाबतीत सहकार्य करावयाचे असे आम्ही सुरुवातीस मान्य केले होते. कम्युनिस्ट पक्षाला आणि सरकारी अधिकाऱ्यांना सध्याची पद्धती सुधारण्यास संधी द्यावी, सामाजिक बदल लक्षात घेऊन कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाच्या भूमिकेबद्दल काही नवी मांडणी केली जाईल अशी त्यामागे अपेक्षा होती; पण आता असे दिसून आले आहे की, कोणालाही सुधारणा नको होती. दुसऱ्या बाजूने थोडी तरी सदिच्छा दाखविली जाईल ही आमची आशाही भ्रामक ठरली. सध्याची परिस्थिती टाळणे शक्य नव्हते हे आता स्पष्ट झाले आहे असे बुजक यानी सांगितले.

लष्करी कायदा उठवा, वालेसा व इतर नेत्यांची मुक्तता करा या मागणीसाठी लाक्षणिक संप घडवून आणण्याचा त्यांचा विचार आहे. सॉलिडॅरिटीच्या नेत्यांवर खटले भरण्यात आले किंवा त्याना पोलंडबाहेर हद्दपार करण्यात आले तर त्याच्या निषेधार्थ संप होईल असेही त्यांनी सांगितले. लष्करी कायद्याचा पहिला हादरा आता ओसरला असून लष्करी राजवटीस स्वयंस्फूर्त प्रतिकार वाढत आहे याची काही उदाहरणे त्यांनी दिली. लष्करी राजवटीस विरोध केल्याबद्दल काही कामगाराना कारखान्यांतून बडतर्फ करण्यात आले. त्याच्या निषेधार्थ कामगारांनी शांततापूर्ण प्रतिकार केला. बुद्धिजीवी वर्गाचे लोक कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदपत्रिका परत करीत आहेत. कम्युनिस्ट राजवटीशी निष्ठेच्या शपथेवर सही करण्यास लोक नकार देत आहेत आणि कलावंत सरकार-नियंत्रित रेडिओ व टेलिव्हिजन कार्यक्रमात भाग घेण्याचे नाकारीत आहेत. हा प्रतिकार वाढत जाऊन सॉलिडॅरिटीचे स्थगित केलेले हक्क तिला पुन: मिळतील अशी शक्यता बुजक यांनी व्यक्त केली.

सॉलिडॅरिटीविरुद्ध कारवाई केली जाणार आहे याची गेल्या उन्हाळ्यापासूनच आम्हाला कल्पना होती; पण लष्करी कायदा पुकारला जाईल असे मात्र वाटले नव्हते, असे बुजक यांनी सांगितले. लष्करी कायदा पुकारला जाण्याच्या काही तास आधी सॉलिडॅरिटीच्या सर्व प्रमुख नेत्यांची बैठक गान्स्क येथे भरली होती. लष्कराच्या, पोलिसांच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. तारा, टेलिफोन, दळणवळण तोडण्यात आले आहे, अशा बातम्या बैठकीच्या जागी आल्या होत्या; पण काही तासातच लष्करी कायदा जारी होणार आहे आणि त्याची ही सुरुवात आहे ही कल्पना सॉलिडॅरिटीच्या नेत्यांना आलेली नव्हती. त्यांची बैठक पुढे चालू राहणार होती; पण १३ डिसेंबरला रात्री १२-२० वाजता ती संपली. त्यानंतर पहाटे २-२० च्या गाडीने वॉर्सांला जाण्याचे बुजक आणि उर्सस ट्रॅक्टर फॅक्टरीमधील सॉलिडॅरिटीचे प्रमुख झिसेक जानास यानी ठरविले. संघटनेचे नेते ज्या हॉटेलामध्ये उतरले होते त्या मोनोपोल हॉटेलला लष्करी पोलिसांनी वेढा दिल्याचे त्यांनी व इतर युनियन नेत्यांनी स्टेशनवरून पाहिले. इतर हॉटेलानाही पोलिसांनी वेढा दिला. अधिकारी सॉलिडॅरिटीविरुद्ध काही मोठी कारवाई करीत आहेत हे उघड झाले होते; पण लष्करी कायदा जारी होणार आहे आणि सॉलिडॅरिटीच्या हजारो नेत्यांना अटक केली जाईल असे मात्र आपल्याला वाटले नाही असे बुजक यानी सांगितले. लष्करी पोलीस निघून गेल्यानंतर बुजक आणि जानास यांनी मोनोपोल हॉटेलमध्ये प्रवेश केला. आपली ओळखपत्रे तेथे डेस्कवर ठेवली. एका युनियन कार्यकर्त्याशी त्यांची भेट झाली. युनियनच्या नेत्यांना अटक झाली आहे असे त्याने सांगितले. पोलीस अजूनही हॉटेलमध्ये तपास करीत आहेत असे त्याच्याकडून समजले, तेव्हा मात्र त्याच्या हाती लागू नये म्हणून ते तेथून निसटले आणि गेल्या दीड महिन्यात भूमिगत चळवळ संघटित करण्यावरच त्यांनी लक्ष केंद्रित केलेले आहे.

लष्करी कायदा जारी होण्यापूर्वीचे वातावरण पुन: लवकर निर्माण झाले नाही तर सशस्त्र भूमिगत चळवळ उभी राहून त्यातून दहशती हालचाली होण्याची शक्यताही मी नाकारीत नाही असे बुजक यानी सागितले; पण त्यांना हा मार्ग पसत नाही. त्यातून अनर्थच ओढवेल अशी भीती त्यांना वाटते. सध्याच्या परिस्थितीत शांततापूर्ण प्रतिकाराचा मार्गच योग्य अशी त्यांची भूमिका आहे गांधीजीचा अहिंसा शब्द त्यांनी वापरला नसेल; पण शांततापूर्ण प्रतिकारातून गांधीजीचाच मार्ग त्यांना अभिप्रेत आहे.

पोलंडच्या लढ्याबद्दल भारतीय जनतेस सहानुभूती आहे. भारतात लष्करी कायदा नव्हता; पण आणीबाणीच्या अनुभवातून भारतीय जनता गेलेली आहे. पोलंडची जनता तेथील आणीबाणीला आणि लष्करी कायद्याला कसे तोंड देते हे जाणण्याची तिला उत्सुकता आहे. बुजक यानी म्हटल्याप्रमाणे सॉलिडॅरिटीसारख्या स्वतंत्र कामगार संघटना लोकशाहीच्या वातावरणातच टिकू शकतात, तेव्हा आपल्या संघटनेचे स्वतंत्र अस्तित्व टिकविण्यासाठी सॉलिडॅरिटीला लोकशाहीसाठीच झगडले पाहिजे आणि लोकशाही जतन केली पाहिजे! सॉलिडॅरिटीचे काँग्रेसमध्ये गेल्या सप्टेंबरात जो कार्यक्रम मंजूर करण्यात आला त्यात सामाजिक व आर्थिक जीवनातील सर्व अंगांच्या पुनर्रचनेवर भर दिला आहे. सॉलिडॅरिटीमध्ये काही प्रतिगामी गट आहेत. त्याना भांडवलशाही पुन्हा आणायची आहे; पण त्यांचे बळ वाढू न देता उजवे व डावे दोन्ही टोकांचे अतिरेक टाळून पोलंडमधील जनतेला लोकशाहीमार्गाने आपल्या समाजवादाची वाटचाल करावयाची आहे. त्यात तिला यश आल्यास जगातील समाजवादी चळवळीला निराळेच वळण लागेल. □

# टॉलस्टॉय – एक माणूस

## एका ग्रंथाची जन्मकथा

सुमती देवस्थळे

आमचे नाना म्हणजे पट्टीचे रसिकवाचक. व्यवसाय–पेन्शनवर. मुक्काम–अर्थात पुणे ! म्हटले तर आमचे नाते लागते...खूप दूरचे...त्यांच्याच शब्दात सागायचे तर 'आखाड-सासऱ्याचे.' पण 'आखाड-सासरेपणा' ते कधीही गाजवत नाहीत. नाना मला आवडतात. कारण त्यांचे बोलणे अगदी मनमोकळे–खुल्लमखुल्ला असते. उगीच आडपडदा ठेवून, स्वत.ची मते लपविण्यासाठी ते गोलमोल भाषा वापरीत नाहीत. वाचनाचा छंद हा आम्हा उभयतांना जोडणारा दुवा. नाना आता थकले आहेत. डोळ्यातल्या मोतीबिंदूमुळे फारसे वाचू शकत नाहीत. पण साठ वर्षांच्या वाचनाने भरपूर संचित जमा झालेले आहे. त्याना भेटून आल्याशिवाय माझी पुण्याची फेरी पूर्ण होत नाही. या वेळी अशी दुपारचीच त्यांच्याकडे गेले होते.प्राथमिक विचारपूस, एकमेकांच्या प्रकृतीची चौकशी, चहापान इत्यादी सोपस्कार उरकल्यावर नानानी आपल्या आवडत्या विषयाकडे मोर्चा वळविला. ते म्हणाले–

'काय ग, सध्या म्हणे तू टॉलस्टॉयचे चरित्र लिहिते आहेस ... आपला तो हा–सांगत होता !'

'थोडीशी दुरुस्ती सुचवते हं. टॉलस्टॉयवर लिहिते आहे, असे नाही, लिहिले आहे. आणि जे लिहिले आहे, ते सांप्रदायिक चरित्र नसून व्यक्तिदर्शन आहे.'

'समजलो ! म्हणजे तेच ते ! चरित्र आणि व्यक्तिदर्शन यात मी तरी काही फारसा फरक मानीत नाही.'

'असं कसं म्हणता नाना, व्यक्तिदर्शन हा चरित्राकडे पाहाण्याचा अगदी नवा अन् वेगळा दृष्टिकोन आहे. व्हर्जिनिया वूल्फचे Modern Biography वरील लेख ...'

'हां हां ! ते तिच्या Common Reader मधलेच ना ? वा ! किती उत्तम विवेचन केले आहे ! म्हणजे त्या पद्धतीचे व्यक्तिचित्रण केले आहेस की काय ?'

'म्हणजे तसा प्रयत्न तरी केलेला आहे खास !'

'पण काय ग,हे चरित्र–नव्हे व्यक्तिदर्शन–तू लिहिलेस कशासाठी?'

भलताच अनपेक्षित प्रश्न ! अवाक् ! नानांना मला अडविल्याचा विचित्र आनंद मिळतो आहे ... पुन्हा तोच प्रश्न ! भान राखून मी उत्तरते–

'स्वतःच्या आनंदासाठी लिहिलंय् ते !'

'मग स्वतः आनंद मिळवलास तो पुरे आहे. छापण्याची का इच्छा धरतेस ? आँ ?'

मी खट्टू स्वरात उत्तर देते, 'हे काय विचारता नाना, इतरांनाही तसा आनंद मिळावा असं वाटणं स्वाभाविकच नाही का ?'

'पण काय ग, ..... विचारू का नको?'

'नाना, तुम्ही अगदी बेधडक विचारा. मला फार आवडेल ते.'

'पहा हो. नाही तर स्पष्ट विचारतोय् म्हणून रागावायाचीस ! पण मला तू असं सांग की, टॉलस्टॉयसारख्या गुतागुतीच्या माणसाचं व्यक्तिदर्शन वाचून उपयोग काय ?'

मी अवाक !

'का ग ? साग ना. टॉलस्टॉय हा एक जगद्वंद्य लेखक होता–संत होता–महर्षी होता... पूर्ववयात प्रमाथी–वासनामय जीवन जगला–त्याच्या हातून भरपूर चुका घडल्या–त्या सर्वांचा तू उल्लेख केलाच असशील...आता त्याच्या हातून चुका घडल्या खऱ्या, पण ते वाचून आजचा मराठी वाचक काही बोध घेईल किंवा सुधारेल, अशी का तुझी समजूत आहे ?'

'नाही ! मी त्या भ्रमात नाही ! जगाच्या बाजारात प्रत्येकानं स्वत.चा अनुभव स्वत.च खरेदी करायचा असतो– इतरावरून काही फारसं शिकता येत नाही याची मला पूर्ण जाणीव आहे.'

'आहे ना ? मग तू हे व्यक्तिदर्शन लिहितेस कशासाठी ?'

'हे पहा नाना, मानवी मन ही एक अगम्य–चमत्कारिक गुतागुत आहे ! त्यात अनेक प्रकारचे विसंवाद आहेत– उदारता आणि क्षुद्रता याचे आश्चर्यकारक रसायन आहे. तरीही तो उत्तुग उंची गाठू शकतो. कोणत्याही प्रकारच्या मर्यादाचे अडसर त्याच्या प्रतिभेला सीमित करू शकत नाहीत. स्वतःशी अत्यंत प्रामाणिक रहाणारा माणूस स्वतःच्या चुकांचे परीक्षण करीत करीत आत्मसुधारणा करीत जातो, अखेर लोकविलक्षण ध्येय साध्य करतो करू शकतो... हा दिलासा वाचकांना हवाच असतो नाही का ? आणि मुख्य म्हणजे एखाद्या प्रभावी व्यक्तीचे सम्यक्दर्शन घेता येणे हाच मुळी एक निरामय आनंदाचा अनुभव असतो. माणूस असाही असतो, हे समजले तर वाचकांना आवडतेच की !'

नानाना माझे म्हणणे कितपत पटले याची शंकाच होती. त्यांचा चेहेरा जरा कसनुसा झाला. काही तरी 'स्पष्टवक्तपणाचा प्रयोग' करून मला अडविण्यात त्यांना नेहमीच खुप गंमत वाटत असते. जरा वेळ विचार करून त्यांनी आपले ठेवणीतले प्रश्न विचारायला सुरुवात केली. वरवर आस्थेवाईकपणाचा आव आणून त्यांनी प्रश्न केला.

'जगात इतके थोर पुरुष होऊन गेले... आपला भारत तर नवरत्नांची खाण वगैरे आहे... असं असताना तुला त्या रशियन माणसाचा अभ्यास करण्याची बुद्धी कशी काय झाली बुवा ?'

'असं पहा नाना, टॉलस्टॉय रशियात जन्मला ही गोष्ट खरी. पण ती एक आंतरराष्ट्रीय व्यक्ती होती हे तर कबूल ?'

'ठीक आहे, तरी पण भारतीय माणसाला ...'

'भारतीय माणसाला तर तो फार जवळचा ! आपल्या राष्ट्रपित्याचे स्फूर्तिस्थानच ते ! दोघाचा थोडासा पत्रव्यवहारही झालेला होता.'

'हो ... हो ! कालिदास नागानी सपादित केलेला तो पत्रव्यवहार मी पूर्वीच वाचलेला होता. पण तरीसुद्धा मला हे समजत नाही की, तू त्या टॉलस्टॉयच्या वाटेला कशी काय गेलीस ?'

'त्याने माझा अहंकार दुखावला–माझी जागा दाखवून दिली म्हणून ...'

'काही तरीच काय बोलतेस सुनबाई ?– १९१० मध्ये मरून गेलेला तो रशियन संत तुझा अहंकार दुखवायला कसा काय आला?'

'याचं उत्तर मात्र जरा विस्तारानं सांगायला हवं !'

'सांग सांग ! मला ते सर्व समजावूनच घ्यायचेय्–सांग !'

'बी. एच्या परीक्षेत मला फर्स्टक्लास मिळाला होता हे तुमच्या लक्षात असेलच.'

'अरे हो, ते मी मध्यंतरी विसरूनच गेलो होतो ... बरं मग त्या फर्स्टक्लासचा धागा टॉलस्टॉयपर्यंत ...'

'कसा पोहोचला ते सांगते ना ! फेलोशिप्, कॉलेजमधले पहिल्या क्रमांकाचे बक्षीस इत्यादी मानसन्मान झाल्यावर मी आत्मपरीक्षण करू लागले. इतक्या मान-सन्मानाला आपण खरोखर लायक आहोत, हे माझे मलाच पटेना. वाङमयाची मी विद्यार्थिनी-पण काहीही अभिजात साहित्य–जगप्रसिद्ध साहित्यकृती–वाचलेल्या नव्हत्या. उगीच आपले टीकाशास्त्रातल्या पुस्तकातील quotations वर पोसलेले 'लखू रिसबूड' बनणे मला हास्यास्पद वाटत होते. म्हणून आपल्या श्रेणीला शोभेसे अभिजात साहित्य वाचायला मी सुरुवात केली.'

'हरे राम ! कशाला Classics वाचलीस ? Classics are only to be admired, never to be read, हे तुला माहीत नव्हतं ?'

'माहित होतं, पण मुळीच पटत नव्हतं. खूप वाचायची उमेद होती. त्या भरात मी पुष्कळ उत्तमोत्तम पुस्तकं वाचली आणि मग War & Peace वाचायला घेतलं.'

'अन् ते पूर्ण वाचलंस की काय ?'

'अर्थात ! पण... अनेक फटके खाऊन !'

'ते कसं काय ?'

'नाना, ती कादंबरी मी पाच-सहा वेळा अर्धवट वाचून सोडून दिली. सुमारे १२५ ते १३५ इतकी पानं झाली की मी अगदी थकून जायची. त्या कादंबरीत शेकडो व्यक्ती आणि त्यांची ती रशियन पद्धतीची दुहेरी नावं ! काही समजेना ! इतकी जगप्रसिद्ध कादंबरी आपल्याला समजू नये ही गोष्ट मला मान्य होईना. अहंकार खूपच दुखावला ! पुष्कळदा प्रयत्न केले; पण सव्वाशे पानांच्या पुढे माझी मजल काही जाईना !'

'मग द्यायचं सोडून ! त्यात काय आहे ?'

'वा ! असं कसं ? एका मे महिन्याच्या सुट्टीत ठरविलं की, काय वाट्टेल ते झालं तरी War & peace पुरी करायचीच ! त्याशिवाय दुसरं काहीही वाचायचं नाही ! अगदी रोजचं वर्तमानपत्रसुद्धा वर्ज्य ! अन् अशी जेव्हा त्या पुस्तकाच्या खनपटीलाच बसले, तेव्हा अर्थातच तो संकल्प तडीला गेला. तरीसुद्धा जवळजवळ चारशे पानांपर्यंत माझी सत्त्वपरीक्षाच होती. पुढे मात्र सारे धागे स्पष्ट होत गेले अन् मग ती जवळजवळ दोन हजार पृष्ठांची कादंबरी झपाटल्यासारख्या मनःस्थितीत वाचून काढली ! एखादे लोकविलक्षण कैलासलेणे पाहिल्यासारखाच आनंद वाटला !'

'बरोबर आहे ! फार थोर पुस्तक आहे ते. किती वर्षं झाली बरं त्या गोष्टीला ?'

'सुमारे वीस एक वर्षं झाली असतील !'

'मग काय ? फार जुनी गोष्ट आहे. आता तुला त्यातलं काही आठवत नसणार ?'

'हो, म्हणजे तपशील फारसा लक्षात नाही ही गोष्ट खरी; पण सबंध ललितकृतीचा जो एक प्रभाव पडतो, तो कसा विसरता येईल ? लेखकाचं सामर्थ्य क्षणाक्षणाला जाणवत होते. war & peace वाचल्यावर कोणत्याही साहित्यकृतीशी सलगी करण्याचा जणू परवानाच मिळाला आणि मग मी 'ॲना कॅरनिना', 'रेसरेक्शन्' इत्यादी कादंबऱ्या वाचल्या. तो अनुभवही अत्यंत आनंददायक होता! जीवनाचं प्रत्ययकारी, वास्तव अन् सम्यग् दर्शन घडविण्याचं टॉलस्टॉयचं सामर्थ्य मला विस्मयचकित करीत होतं. वाचकाला संपूर्णपणे तन्मय करण्याची विलक्षण शक्ती त्या अभिजात लेखकात आहे, असा मला सतत प्रत्यय येत होता. मग मी त्याची इतर पुस्तकंही वाचत सुटले...'

'पण तुझे कॉलेज–लेक्चर्स...'

'होय नाना ! कॉलेजच्या नोकरीचे निर्बंध होते. संसार, मुले–बाळे इत्यादी सर्व वेळ खाणारी साधने होती. तरी तो आन्हिकाचा भाग उरकून मी केवळ व्यक्तिगत आनंदासाठी टॉलस्टॉय वाचीत होते. लेक्चर्ससाठी वाचावं लागतं. त्यातही आनंद असतोच; पण त्यापेक्षा आपला जीव संपूर्णपणे रमविणारा एखादा वेगळा छंद असतोच की !'

'असतो तर !......पण मला असं सांग की, त्या वाचनाचा तुझ्या पुस्तकाशी काही तसा साक्षात् संबंध नाही, होय ना ?'

'खरंय् ते; पण एखाद्या लेखकाच्या साहित्यानं मन भारावलं की, ते लिहिणारा लेखक कसा असेल याची जिज्ञासा निर्माण होते. विशेषतः टॉलस्टॉयच्या वाचकांना तशी जिज्ञासा वाटणं अपरिहार्य आहे. कारण त्याच्या जीवनपद्धतीचा जिवंत प्रत्यय त्याच्या ललितकृतीतून येत असतो. त्याचे किती तरी व्यक्तिगत अनुभव जसेच्या तसे त्याच्या साहित्यात आलेले आहेत. म्हणून त्याचे साहित्य वाचल्यावर त्या व्यक्तीकडे, त्याच्या चरित्राकडे मी धाव घेतली !'

'अन् हे सारं केलंस तरी केव्हा ?'

'नाना, कॉलेजला उन्हाळ्यात चांगली तीन महिन्यांची प्रदीर्घ रजा असते. त्या वेळी मी युनिव्हर्सिटीत वाचायला जात असे. रिसर्चसाठी एक टेबल राखून ठेवलं होतं. अखेर माझं ते संशोधन अर्धवटच राहिलं ! त्यातल्या रुक्ष आकडेमोडीशी काही माझा सूर जुळला नाही; पण त्या नीरस खटपटीत जरासा 'रिलीफ' मिळावा म्हणून जोडीला मी जी टॉलस्टायची चरित्रं वाचत होते, ती मात्र फारच वेधक होती !'

'चरित्रं ?... एकाच माणसाची अनेक चरित्रं कशाला वाचायची ? एक वाचलं की पुरत नाही का ?'

'नाही ना ! टॉलस्टॉयच्या बाबतीत तीच तर गंमत आहे. त्याची अनेक चरित्रं वाचावीच लागतात !'

'का बरं ?'

'कारण प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगळा असतो ! काही चरित्रकार पूजक असतात, तर काही चरित्रकार काकदृष्टीचे असतात. त्यामुळे होतं काय की, अनेक चरित्रं वाचूनही पुरेसा टॉलस्टॉय समजत नाही तो नाहीच !'

'मग द्यावा नाद सोडून !'

'पण तो सुटला पाहिजे ना ? सुटू शकतच नाही ! इतकी

पृष्ठ २१ वर

## मित्रमंडळ संस्था, पुणे

# गैरकारभार की भ्रष्टाचार ?

श्री. प. दि. सोहोनी, कामगार कायदेसल्लागार, पुणे

एकमेकास सहाय्य, लोकशाही व्यवस्था, सभासदांची आर्थिक व सामाजिक उन्नती ह्या मूलभूत तत्त्वांवर सहकारी संस्थांची उभारणी व भरभराट अपेक्षित आहे. महाराष्ट्रात गेल्या ३० वर्षांत सहकारी संस्थांची झालेली वाढ लक्षणीय असून अनेक क्षेत्रांत सहकार-चळवळ फोफावली आहे.

शहरी मध्यमवर्गीयात सहकारी तत्त्वावर झपाट्याने घरबांधणी होण्याचे मुख्य कारण घराची तीव्र टंचाई व त्यांच्या बेसुमार किंमती. पुण्यामध्ये सहकारी तत्त्वावर घरबांधणी ही कल्पना प्रत्यक्षात गेल्या वहा-वीस वर्षांतच वाढत्या औद्योगीकरणामुळे जोम धरू लागली व बऱ्याच संस्था उदाहरणार्थ आदिनाथ, राजश्री, शाहू, सिंध सोसायटी, मित्रमंडळ, मीरा सोसायटी वगैरे अल्पावधीतच नावारूपास आल्या. सदर संस्था ह्या मुख्यत: मध्यम व उच्च मध्यमवर्गीयांच्या असून सभासद सुशिक्षित व जाणकार असल्याने ह्या संस्थामध्ये तरी राजकारण व भ्रष्टाचारास स्थान न राहता उत्तम व्यवस्थापनाची अपेक्षा असणे स्वाभाविकच आहे. सध्याच्या राजकीय व सामाजिक भ्रष्टाचाराच्या विरोधात मुख्यत्वेकरून मध्यमवर्गच सर्वांत जास्त पुढाकार घेत आहे. अशा वेळेस हा वर्ग स्वत: त्यासाठी किती प्रमाणात जबाबदार आहे, याचे परीक्षण करणे आवश्यक आहे व त्या दृष्टीने पाहता अशा मध्यमवर्गीयांची प्रातिनिधिक म्हणून समजल्या जाणाऱ्या सहकारी संस्थांमध्येसुद्धा राजकारण व भ्रष्टाचाराची हळूहळू वाढ होत असल्याचे दिसते.

मित्रमंडळ सहकारी सोसायटी ही पुण्यातील जुनी सहकारी संस्था असून ती सुमारे ३० वर्षांपूर्वी स्थापन झाली. त्या वेळी साधारणत: मध्यम स्थितीतील लोकांनी एकत्र येऊन पर्वतीच्या पायथ्यापाशी जागा घेऊन वसाहत स्थापन करण्याचा निर्णय घेतला. सुरवातीच्या काळात वीज, पाणी, रस्ते इत्यादी सोयीसुद्धा उपलब्ध नव्हत्या; परंतु संस्थापक-सदस्यांनी चिकाटीने व धडाडीने काम करून संस्था भरभराटीस आणली बहुसंख्य सभासदांची घरे बांधून झाल्यानंतर सभासदांच्या सोयीसाठी सभासदाकडून कर्जाऊ ठेवीची रक्कम घेऊन एक बहुउद्देशीय सभागृह बांधण्यात आले व त्याचा उपयोग मुख्यत: सभासदांच्या व सोसायटीच्या वापरासाठी व्हावा अशी योजना व अपेक्षा होती; परंतु कर्जफेड लवकर व्हावी या दृष्टीने सभागृह बिगर-सभासदांस, ते मोकळे असल्यास भाड्याने देण्याचे ठरविले; परंतु सदर ठरावापाठीमागचा हेतू कालांतराने सोयिस्करपणे विसरला गेला असे दिसते व मंगल कार्यालय चालविणे हाच मुख्य धंदा झाला व कर्जाची रक्कम फिटून गेली तरीसुद्धा कार्यालय बिगर-सभासदांस भाड्याने दिले जाऊ लागले. वास्तविक सदर सभागृह हे बॅडमिंटन, टेबलटेनिस ह्यासारख्या खेळांसाठी, तसेच वाचनालय, मुलांची शाळा, महिला मंडळ, करमणुकीचे खेळ, व्याख्यान–चर्चा इत्यादीसाठी वापरणे अपेक्षित होते व आहे.

कुठल्याही गोष्टीचा धंदा सुरू केला म्हणजे मुख्य हेतूचा किती विपर्यास होऊ शकतो ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे हे सभागृह! हे सभागृह सभासदास पाहिजे असलेल्या तारखेच्या आधी ३ महिने मागणी केल्यास त्यास ते अग्रहक्काने दिले जाईल, असा ठराव सोसायटीच्या कार्यकारी मंडळाने केला आहे. सदर ठरावाची अंमलबजावणी करावयाची म्हणजे कुठल्याही बिगरसभासदास ३ महिन्यांच्या अगोदर कार्यालय देता येत नाही हे उघडच आहे. सभासदांना कार्यालयाच्या भाड्यातही सवलत असून सभासदाचे स्वत:चे (अथवा जवळच्या नातेवाइकाचे) कार्य असल्यास अशी सवलत मिळते. सोसायटीतील एक सभासद श्री. शित्रे यांनी १३ एप्रिल १९८१ रोजी अग्रहक्काने सोसायटीचा हॉल दि. ५ व ६ डिसेंबर १९८१ या तारखासाठी मागितला व सोसायटीने दि. १४-४-८१ च्या पत्राने सदरील तारखाना त्यांच्या नावाची नोद केल्याचे कळविले वर उल्लेख केलेल्या ठरावाप्रमाणे सभासदास अग्रहक्क असल्याने व बिगरसभासदाची ५-९-८१ पर्यंत हॉलची मागणी स्वीकारता येत नसल्याने दि. ४-९-८१ पर्यंत केव्हाही पैसे भरण्याची सवड होती; परंतु दि. ३-९-८१ रोजीच सोसायटीने हॉल एका बिगरसभासदास दि. ५ व ६ डिसेंबरकरता दिला. हा बिगरसभासद व सोसायटीचे अध्यक्ष हे पूर्वी एकाच संस्थेत नोकरीस होते, हा कदाचित योगायोगही असेल! बिगरसभासदास दि. ५ व ६ डिसेंबरसाठी कार्यालय दिल्याचे समजल्यावर श्री. शित्रे यांनी प्रथम सोसायटीच्या कार्याध्यक्षांशी फोनवर बोलणे केले; परंतु तिथे दाद न लागल्याने दि. ४-९-८१ रोजी प्रत्यक्ष सोसायटीत जाऊन पूर्वीच्या नोंदलेल्या मागणीप्रमाणे फक्त ६-१२-८१ ला कार्यालय मागितले व तांत्रिक पूर्ततेसाठी फॉर्म भरून पैसे देऊ केले; परंतु पूर्वीची नोद, नियम, सभासदाचे हक्क, अधिकार वगैरे सर्व बाजूला ठेवून कार्यालय देण्यास नकार दिला गेला!

सभासदांच्या हक्कसंरक्षणासाठी श्री. शित्रे यांनी न्यायालयात दावा लावून दि. ६-१२-८१ रोजी बिगरसभासदास कार्यालय देऊ नये, असा तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळविला व कार्याध्यक्ष व अध्यक्ष हे आपल्या पदाचा दुरुपयोग करीत आहेत असा आरोप केला. सोसायटीतर्फे अनेक तांत्रिक व कायदेशीर हरकती घेण्यात आल्या.

दावा मुख्यत्वेकरून सभासदाच्या हक्कासाठी असल्याने सभासदाना कार्यालय अग्रहक्काने मिळण्याचा हक्क मान्य करून सोसायटीने आपली चूक कबूल करावी, असा तडजोडीचा प्रस्तावही सोसायटीतर्फे नाकारला गेला!

दि. २-१२-८१ रोजी कोर्टाने मनाई अर्जावर निर्णय दिला. सदर निकालाप्रमाणे सोसायटीचे सर्व मुद्दे अमान्य करण्यात आले. परंतु बिगरसभासदाकडे लग्न असल्याने व त्याने दि. ३-९-८१ रोजी पैसे भरून करार

पूर्ण झाला असल्याने मनाई उठविली.

या निकालाविरुद्ध दि. ४–१२–८१ रोजी अपील करण्यात आले व नंतर त्याच दिवशी सायंकाळी हायकोर्टात प्रकरण दाखल झाले. त्याची प्राथमिक सुनावणी दि.५-१२-८१ रोजी सुरू झाली. सुनावणीचा एकूण रागरंग बघून सोसायटीच्या अध्यक्षानी सभासदाची सर्व पर्यायी व्यवस्था दुसरीकडे करून देण्याचे आश्वासन (अंडरटेकिंग) ना. हायकोर्टास दिले व तूर्तातूर्त मनाईपुरते प्रकरण तिथे मिटले. (सभासदांच्या हक्काचा प्रश्न असल्याने मूळ दावा अद्याप चालू आहे.)

परंतु वरील प्रकरणामुळे खालील प्रश्न उपस्थित होतात :–

(१) बिगरसभासदास सोसायटीचे सभागृह तीन महिन्यांच्या आधी दिल्यास कोणीही केव्हाही सभागृह घेऊ शकेल व त्याच्याकडून जास्त भाडे मिळणार असल्याने सभासदास अग्रहक्काने ते मिळण्याचा संभवच राहणार नाही व त्याबाबतचा ठराव कागदावरच राहील.

(२) सहकारी संस्थेत सभासदाचे हित व सोय पहाणे हा मूलभूत उद्देश असता त्याला हरताळ फासून खुर्चीच्या जोरावर सत्तेचा वापर करून कोर्ट-दरबार, पर्यायी जागा इत्यादी निरर्थक बाबीवर संस्थेचे हजारो रुपये उधळले गेले ते कशासाठी व त्यास जबाबदार कोण ?

(३) सभासदासाठी सुमारे ८ महिने सभागृह नोंदविले असताना ते नियमाविरुद्ध व सभासदाचे हक्क डावलून, बिगरसभासदास देण्यापूर्वी सभासदास तसे कळविण्याचे सौजन्य व्यवहारास धरून होते.

(४) बिगरसभासदाचे कार्य सभागृहात व सभासदाचे मात्र बाहेर ही गोष्ट कार्यकारी मंडळ टाळू शकली नसती का ?

कार्यालय चालविणे हा सोसायटीचा धंदा असल्यास तो तरी नीट केला पाहिजे. सोसायटीच्या जवळपास लहान व कमी सोयीच्या कार्यालयाचे भाडे दिवसाला १५०० व २००० रु. असताना सोसायटी मात्र दिवसास रु. ८०० घेते, हे व्यवहाराला धरून निश्चित नाही. जानेवारी १९८२ मध्ये एका दिवंगत सभासदाच्या मुलाला कार्यालय सवलतीच्या दराने न देता संपूर्ण भाडे आकारून देण्यात आले. कारण दिवंगत सभासदाच्या वारसाची नावे दप्तरी दाखल झाली नाहीत. म्हणजे वारसाची नावेही वेळेवर लावायची नाहीत व त्याचा भूर्दंडही सभासदानीच सोसावयाचा.

या सोसायटीमध्ये एक मोठे पटांगण असून त्याचा उपयोग सभासदांच्या मुलाना खेळण्यासाठी करून देण्याऐवजी ते रिकामे पडून आहे. सोसायटीची आर्थिक स्थिती कमकुवत असती तर वरील गोष्टी क्षम्य ठरल्या असत्या. परंतु आपल्या हातातील सत्ता व साधनसामग्री याचा उपयोग विधायक गोष्टीसाठी वापरण्याचे तारतम्य निदान सुशिक्षित कार्यकारी मंडळाने दाखविले पाहिजे.

सिंहगड रस्त्यावरील दुसऱ्या एका मोठ्या सहकारी संस्थेतील पदाधिकाऱ्यानी घरे बांधणाऱ्या ठेकेदाराशी संधान बांधून चार लाखाचे कामासाठी नऊ लाख रुपये ठेकेदारास दिले व सभासदांनी या रकमेला मंजुरी दिल्याशिवाय घरांचा ताबा देण्याचे नाकारले. अशा परिस्थितीत सभासदाच्या असहाय्य स्थितीचा फायदा उठविला गेला. कारण नाही तर त्यांना रहावयास जागाच मिळाली नसती.

येरवडा भागातल्या एका सहकारी संस्थेला शासनाकडून स्वस्त दराने जागा व आर्थिक सहाय्य मिळाले. हेतू हा की, सभासदांना स्वस्तात घरे मिळावीत. या संस्थेला सभासदाच्या प्लॉटवर घरे बांधण्याचा अधिकार नसतानासुद्धा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी निविदा न मागविता काही प्लॉटवर घरे बांधली व संस्थापक-सदस्यांचे हक्क डावलून नवीन सभासदांशी हातमिळवणी करून त्याना घरे दिली.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या नातेवाइकांकडूनच घराचे बांधकाम करून घेण्याचे बंधन काही सोसायट्यांनी घातले आहे. असे बंधन उच्च सामाजिक आदर्शात निश्चितच बसत नाही.

मध्यमवर्ग राजकारणात काही अंशी उदास असतो, हे बहुताशी गृहीतच धरले जाते. परतु सामाजिक अन्यायाचा परिणाम स्वत वर होत असतानासुद्धा स्वतःच्या हक्काची जाणीव न ठेवता उदासीन रहाण्याचे सोडून देऊन आपले कुठे चुकते आहे याचे भान ठेवणे अगत्याचे आहे. त्या दृष्टीने सहकारी संस्थांतील सभासदानी अंतर्मुख होऊन विचार करून त्यावर काही उपाययोजना करणे जरुरीचे आहे. ☐


**NEW TITLES RECEIVED**

1. **Picasso** (Biography–his life and work) Ronald Penrose
2. **Mustang–A lost Tibetan Kingdom** (Travel Himalayan Kingdom where even the wheel is not used.) Michel Piessel
3. **Your Health–1** Dr. Padam Singhri
4. **Yorkshire And Back** (Autobiography) Ray Illingworth (Cricket)
5. **Our Magnificent Wildlife** (Reader's Digest book) Profusely illustrated in colour
6. **The Book of Indian Animals**–S. H. Prater (Colourfully Illustrated)

☐ *Phoenix–a library which has extended the life of a newspaper from one day to several years.*

☐ *Phoenix is a labour of love !*

**The Phoenix Library**

727, opp. Sadashiv Post, Pune–30.

अवतीभवती । शरद कृष्णन्

# □ महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री

अब्दुल रेहमान अंतुले यानी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यापासून महाराष्ट्राची सुभेदारी कोणाला बहाल केली जाणार याच्या वावडया उडत होत्या. प्रथम असे सांगितले गेले की, सत्ताधारी पक्षाच्या राज्य विधिमंडळ पक्षावर ही जबाबदारी सोपवली जाईल. *राज्य विधिमंडळ पक्षाने ही जबाबदारी पुन्हा केंद्रीय नेतृत्वा*वर म्हणजेच इंदिराजीवर सोपवून दिली. मग दिल्लीतून, मुंबईतून नवीन नवीन बातम्याच्या पुडया सुटत होत्या. राजकीय वर्तुळात चर्चासत्रे झडत होती. बडे बडे नेते मुंबई–दिल्ली अशा फेऱ्या मारत होते. दरम्यान 'भारत बंद'चा विरोधी पक्षाचा बुलंद नारा दुमदुमला! मुख्यमंत्रीपदाची निवड थोडी-फार मागे रेटली गेली. 'भारत बंद'ला कसा पाठिंबा नाही याचा सविस्तर तपशील आकाशवाणी व दूरदर्शनवरून देण्यात आला. सरकारी–निमसरकारी कचेऱ्यांतून धमकीपत्रे प्रसिद्ध करण्यात आली. १९ जानेवारीच्या 'भारत बंद'बाबत आकाशवाणी काय वृत्त देते म्हणून रेडिओ लावला आणि बातमी ऐकली की, बाबासाहेब भोसले यांच्या गळयात नेतेपदाची माळ पडली *आहे ! ऐकण्यात काही तरी गफलत झाली असावी असे* वाटले. दिल्लीच्या 'स्टेटसमन'पासून पुण्याच्या 'प्रभात'पर्यंत सारी दैनिके डोळयाखाली होती; पण बाबासाहेबांचे नाव काही कोठे पुसटतेही वाचले नव्हते आणि बातम्यांत तर बाबासाहेबाचेच नाव होते. खातरजमा करून घेण्यासाठी दूरदर्शनच्या बातम्या पाहिल्या. दूरदर्शनने बातमी दिली तेव्हा संशय फिटला ! दूरदर्शनजवळ बाबासाहेबाचे छायाचित्रही नसावे. अन्यथा ते जरूर दाखवले गेले असते. जी छायाचित्रे तयार होती ती तशीच पडून होती ! बाबासाहेबाची निवड ही तशी धक्कादायक असली तरी त्याहून धक्कादायक बाब म्हणून वृत्तपत्राच्या खास बातमीदाराच्या हास्यास्पद बातमीपत्राचा उल्लेख करावा लागेल.

## कोणालाच सुगावा नाही !

महाराष्ट्राच्या नेतेपदी बाबासाहेबांची निवड कशी झाली, का झाली याचा कुणाला सुगावा नव्हता. अंतुलेजी हालल्यापासून कोण येणारच्या खमग वार्ता पहिल्या पानावर जागा पटकावून होत्या. मातब्बर दैनिकांच्या बातम्यातही उदंड विसंगती होती. पुण्यातील एका प्रमुख दैनिकाने कोणत्याही परिस्थितीत, सत्ताधारी पक्षाच्या विधिमंडळ-सदस्यातूनच नेता निवडला जाईल, अशी निःसंदिग्ध शब्दामध्ये ग्वाही दिली होती. दोनच परिच्छेद सोडून खाली आल्यावर अशा मर्यादेमध्ये नेता निवडणे इंदिराजीना अवघड वाटत असल्याने कदाचित केंद्रीय मंत्र्यांपैकी कोणाची तरी वर्णी लावण्यात येईल, असेही म्हटले होते. दुसऱ्या एका पत्राने मुख्यमंत्रिपदासाठी निवड करताना कोणते निकष लावले जातील याची जंत्री देऊन, त्या निकषाशी सुतराम संबंध नसलेल्या दोन-चार नावाचा संभाव्य मुख्यमंत्री म्हणून उल्लेख केला होता ! केंद्रीय नेतृत्वाने ज्याच्यावर ही निवडीची कामगिरी सोपवली होती ते नरसिंहराव आणि मुपनार यांनाही नेमके कोण येणार याची जाणीव नव्हती आणि तरीही सर्व प्रमुख दैनिकाच्या पहिल्या पानावर नवीन नवीन नावाच्या उताऱ्या होतच होत्या ! प्रतिभाताई, वसंतदादा, शंकरराव, प्रेमलाताई, शिवराज ही नावे वारंवार घेतली जात होती. अंतुलेजीनी ज्यांच्या नावाचा उघड उघड पुरस्कार केला होता त्या गुलाबरावांचे आणि रामरावांचे नाव केव्हाच मागे पडले होते. वर्तमानपत्रांच्या लेखी निवड शंकरराव, शिवराज व प्रतिभाताई यांच्या मर्यादेत राहील, असे एकूण चित्र तयार झाले. दरम्यान केंद्रीय मंत्रिमंडळाची फेररचना होऊन, शिवराज पाटील सरक्षण मंत्रालयातून वाणिज्य-मंत्रालयात आले. त्यांचे खाते बदलले त्या अर्थी त्याच्या नावाचा विचार होण्याचा संभव नाही, ही सर्वसाधारण माणसाला समजणारी गोष्ट वृत्तपत्रांनी ठासून सांगितली. मग असे सांगण्यात आले की, इदिराजीना शक्य तो अल्पसख्य जमातीची व्यक्ती मुख्यमंत्रीपदी बसवायची आहे. याच दृष्टिकोनातून केंद्रीय माहिती आणि नभोवाणीमंत्री वसंत साठे याचे नाव एक दिवस चमकून गेले ! दुसऱ्या दिवशी शिवराज इंदिराजींना भेटले आणि पेपरवाल्यानी पुन्हा व्यापारमंत्री म्हणून नेमणूक झालेले शिवराजच येणार, अशा खास वार्ता दिल्या. जेवढी म्हणून संभाव्य नावे होती तेवढी सारी घेऊन झाली तरी बाईकडून नाव घोषित होईना. इदिराजीनी अखेरीस शंकरराव चव्हाणाचे नाव निश्चित केले होते; परंतु अतुलेजीनी त्यांच्या नावास विरोध केला, अशी बातमी 'स्टेटसमन'ने दिली. इतकी नावे वाचून झाली होती की, रस घेऊन हा तपशील वाचणारे लोकही कंटाळले आणि आणखी एखादा दिवस गेला असता तर आता नाव तरी कोणाचे छापावे, असा प्रश्न पेपरवाल्याना पडला असता. अशी परिस्थिती असताना इंदिराजीनी बाबासाहेबाचे नाव घोषित केले ! बाबासाहेबांची नेतेपदी निवड झाल्यावर जे आश्चर्य व्यक्त करण्यात *आले ते तसे स्वाभाविक असले तरी त्याच्या निवडीमुळे दिल्ली*मधील खास बातमीदारी किती पोकळ, ऐकीव, उथळ व स्वकल्पनाना वृत्ताची झूल चढवणारी असते, हे पण पुरेसे स्पष्ट झाले आहे !

## निवडीचा अन्वयार्थ

बाबासाहेबांची नेतेपदी निवड झाल्यावर, केवळ उपचार म्हणूनही नवीन नेत्याला विधिमंडळ पक्ष-सदस्यांपुढे उभे करण्यात आलेले नाही. बाबासाहेबाच्या अंगावर लगोलग मुख्यमंत्रीपदाची वस्त्रे चढवण्यात आल्यामुळे, त्यांच्या निवडीनंतर विधिमंडळ सदस्यांना श्वास घेण्याची उसंतही देण्यात आलेली नाही. अंतुलेजीचे ज्या निर्लज्जपणे समर्थन करण्यात आले होते त्यावरून विधिमंडळ सदस्य सत्ताकेंद्राच्या पायी किती बाधले गेले आहेत याचे दर्शन झाले. बाबासाहेबाची निवड हा अंतुलेंचा विजयही नाही आणि पराभवही नाही. तसेच हा निर्णय घेताना इंदिराजीवर अंतुले गटाचे दडपण नव्हते, असे मानता येणार नाही. अंतुलेजीनी खिरापती वाटून एवढी माणसे बांधून ठेवली असतील याचा अंदाज दिल्लीमध्ये नसावा. तो आल्यावर आस्ते आस्ते परंतु निश्चितपणे अंतुलेजीना त्याची जागा दाखवली जाईल यात सदेह नाही ! बाबासाहेबानी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली त्या वेळी अंतुलेजीबद्दल त्याना वाटणारे 'ममत्व' शब्दांतून आणि दूरदर्शनवरील दृश्यातून पुरेसे व्यक्त झाले होते. हेच बाबासाहेब दिल्लीला एकच फेरी मारून आल्यावर अंतुलेजीबाबत ताठर झालेले दिसतात ! बाबासाहेबाच्या मंत्रिमंडळामध्ये अतुले गटाची काही मंडळी असणार हे निश्चित; परंतु किती माणसे *आत येतात आणि त्यांच्याकडे कोणती खाती सोपवण्यात येतात*, हे महत्त्वाचे आहे. हा मजकूर लिहीत असताना मत्रिमंडळाची जडणघडण झालेली नाही; परंतु बाबासाहेब ज्या पद्धतीने बोलत आहेत त्यावरून अंतुलेजीपासून नवे मंत्रिमंडळ शक्य तेवढे दूर जाईल असा एक अंदाज आहे. बाबासाहेबांचे नाव अंतुलेजीनी सुचवले नसले तरी त्यांची निवड होत असल्याचे त्यांना कळवण्यात आले असल्याचे दिसून येते. ही निवड सर्वस्वी आपली आहे असा देखावा अंतुलेजींना

तसंच त्यांचा पाठपुरावा करणाऱ्या मंडळींनाही ठेवावाच लागेल आणि तसा त्यांनी तो ठेवलाही आहे. न्यायालयीन निर्णयामुळे बदनाम होऊन त्यांनी आपले मुख्यमंत्रीपद केंद्रीय नेतृत्वाच्या आदेशाप्रमाणे लगोलग सोडले असले तरी त्यांच्या महत्त्वाकांक्षेला मुरड पडलेली नाही. ज्या रुबाबात ते बाबासाहेबांच्या शपथविधी-समारंभामध्ये मिरवले ते पाहिल्यावर अंतुलेजी हार मानण्याच्या मनस्थितीत नाहीत, हे निश्चितपणे दिसून येते. तथापि आता ते मुख्यमंत्रीपदी नसल्याने केवळ त्यांच्याजवळ असलेल्या सत्तेमुळे जी मंडळी त्यांच्या भोवती जमा झाली होती ती आता झपाट्याने बाजूला होतील !

केंद्रीय नेतृत्वाची अंतुलेजीबाबत काय भूमिका रहाणार आहे याची झलक, बाबासाहेबांमागोमाग, मुंबईत येऊन पत्रकार परिषद घेणाऱ्या सीताराम केसरी आणि जी. के. मुपनार यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट झाली आहे. हे दोन्ही नेते इंदिराजींचे मनोगत बोलून दाखवण्यासाठीच मुंबईमध्ये आले होते आणि त्यांनी ते पुरेसा स्पष्ट शब्दांत बोलून दाखवले आहे. वारं कोणत्या दिशेने वाहात आहे हे ओळखणारी सत्ताधारी पक्षामधील धूर्त मंडळी लगोलग ध्यायचा तो बोध घेतीलच. अंतुलेजींची सत्ता गेलीच आहे; पण खिशात चेकबुक घेऊन फिरणारे आणि मनात येईल त्याप्रमाणे लहान-मोठ्या रकमांची खैरात करणारे अंतुलेजी ज्या प्रतिष्ठानांचे नियंत्रण करतात त्या प्रतिष्ठानचा पैसा त्यांच्या हातून काढून घेण्याच्या दृष्टीने कारवाई करण्यात येईल. हा पैसा हातातून गेला की, अंतुले मोठ्या प्रमाणावर निष्प्रभ होतील ! एकीकडे निष्ठेची भाषा करायची आणि दुसऱ्या बाजूने आपल्या ताकदीचे प्रदर्शन करत दडपण आणायचे, हे अंतुले-तंत्र इंदिराजी खपवून घेणार नाहीत ! भल्याभल्यांना त्यांनी धूळ चारली आहे तिथे अंतुले त्यांना जड जातील असे म्हणता येणार नाही. ज्या झपाट्याने त्यांनी अंतुलेजींना लगोलग राजीनामा देण्याबाबतचा आदेश दिला आणि त्यांना सत्तेवरून दूर केल्यानंतर ज्या हालचाली चालू आहेत त्या पहाता, येत्या चार-सहा महिन्यात अंतुलेजी इंदिराजींना हवे आहेत तितके पातळ झालेले दिसतील !

बाबासाहेबांचे मंत्रिमंडळ हे काळजीवाहू सरकार राहील असा एक स्वाभाविक समज आहे. तो समजा खरा असला तरी तो तसा राहू देणे हितावह नाही. मुपनार यांनी बाबासाहेब हे संपूर्ण अधिकार असलेले मुख्यमंत्री असून ते मुदत संपेपर्यंत मुख्यमंत्री राहतील, असे मुंबईत येऊन स्पष्ट केले आहे. अंतुलेजींच्या अपिलाचा निकाल लागेपर्यंत बाबासाहेब मुख्यमंत्री राहतील, असा समज अंतुले गटाद्वारा प्रस्तुत करण्यात आला होता. तो समज मुपनार यांनी खोडून काढला आहे. बाबासाहेब आपले राजकारण करताना इंदिराजी व राजीव यांचा कठोर पाठपुरावा करत राहतील. मुंबई-दिल्ली हवाई फेरी झाल्यानंतरच प्रत्येक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला जाईल. मंत्रिमंडळामधील प्रत्येक नावावर दिल्लीची मोहोर उठलेली असेल ! दिल्ली जर अंतुलेजींबाबत ताठर झाली तर बाबासाहेब हे त्यापुढे जाऊन ताठर होतील. दुसऱ्या कोणाचे उदाहरणच द्यायचे झाले तर आंध्र प्रदेशचे अंजय्या ज्या पद्धतीचे राजकारण करत आहेत, त्या पद्धतीचे आणि दर्जाचे राजकारण बाबासाहेबांकडून होईल, असे दिसते आहे राज्याचे मुख्यमंत्री पूर्वी म्हणजे अगदी जवाहरलालजींच्या काळापासून दिल्लीतूनच निश्चित होत असता जनता-राजवटीतही मुख्यमंत्रीपदाचे वाटप दिल्लीतूनच झाले; पण एकदा मुख्यमंत्रीपदी निवड झाल्यावर निवड झालेल्या नेत्याला जे स्वातंत्र्य मिळत असे ते आता अजिबात राहिलेले नाही ! त्यांचे सहकारी; दुय्यम सहकारी दिल्ली ठरवणार. प्रत्येक महत्त्वपूर्ण निर्णय दिल्लीत निश्चित होणार. सत्तेचे असे भयावह केंद्रीकरण झाल्यामुळेच बाबासाहेबांसारखी अनपेक्षित व्यक्ती आज मुख्यमंत्रीपदी विराजमान झाली आहे. मुख्यमंत्रीपदाचे इतके केविलवाणे व हास्यास्पद प्रदर्शन यापूर्वी कधीही झालेले नव्हते ! प्रत्येक मुख्यमंत्री आज इंदिराजींची मेहरनजर असल्यामुळे सत्तेवर आहे. अंतुलेजी सत्तेचा-पैशाचा शक्तीप्रमाणे वापर करून स्वयंप्रकाशी होऊ पहात होते. त्यांचे तेज दिल्लीला चटके बसण्याइतपत शक्तीशाली असले तरी अंतुलेजी हे मस्ती करण्याइतके शक्तिशाली झालेले असतील याची पूर्ण जाणीव दिल्लीत नव्हती. मुख्यमंत्रीपद सोडताना आणि त्यानंतर त्यांनी जे सामर्थ्यप्रदर्शन केले-करवले त्याची नोंद दिल्लीत झाली आहे. स्वाभाविकपणे यापुढे कोणी मुख्यमंत्री हे असे काही करू शकणार नाही, याची दखल दिल्लीमध्ये घेतली जाईल. मुख्यमंत्रीपदाला सध्या जी सुभेदारपदाची अवकळा आली आहे ती तशीच राहील. सत्तेचे राजकारण खेळणारे बाबासाहेबांना सहजी खपवून घेणार नाहीत असा एक समज आहे. अंतुलेजी सत्तेवर आले तेव्हाही असेच बोलले जात होते. मराठा लॉबीचा धाक दाखवला जात होता; परंतु *अंतुलेजींच्या प्रत्येक निर्णयाचा दिल्लीने* पाठपुरावा केला. न्यायालयाकडून त्यांच्यावर ठपका ठेवला जाईपर्यंत दिल्लीचे हे धोरण कायम होते आणि सत्तेवर असलेल्या अंतुलेजींविरुद्ध बोटे मोडण्याखेरीज त्यांचे विरोधक फारसे काही करू शकले नाहीत ! धीर धरून दादांनी मुंबईमध्ये अंतुले-विरोधात खासदार एकत्र आणले होते; पण ५३ खासदारांपैकी ८ खासदारसुद्धा जमा होऊ शकले नाहीत आणि जे जमा झाले त्यांनाही पुढे दिल्लीत कानपिचक्या दिल्या गेल्या. मुख्यमंत्रीपदी निवड होण्यापूर्वी बाबासाहेब भोसले हे अनेक मंत्र्यांपैकी एक होते. एकदा त्यांच्या हाती राज्याची सूत्रे दिल्यावर बाबासाहेब हे दिल्लीचा पूर्ण आशीर्वाद असलेले सत्ताकेंद्र बनतात. आपोआप शक्तिशाली होतात. अर्थात असे असले तरी व्यक्तिगत कर्तृत्वाचा भाग अवश्य असतोच आणि हे व्यक्तिगत कर्तृत्व काही किमान पातळीचे असावेच लागते.

राजस्थानच्या जगन्नाथ पहाडिया यांच्यामागे काय दिल्लीची शक्ती नव्हती ? आमदारांचा काय कमी पाठपुरावा होता ? पण राज्यपातळीवरील नेतृत्व पेलण्यासाठी जे काही किमान कर्तृत्व लागते ते ते दाखवू न शकल्याने पहाडिया अस्तंगत झाले. अगदी अनपेक्षितपणे बाबासाहेबांना महत्त्वपूर्ण सत्तास्थान प्राप्त झाले आहे. बाबासाहेब तसे भडक बोलणारे आहेत. त्यांनी यशवंतराव चव्हाणांचा एकदा खरपूस समाचार घेतला होता. उसाची मोळी म्हणून यांना डोकीवर घेतले, पण हे बांबू निघाले, असे काहीसे ते बोलले होते. वसंतदादांनाही त्यांनी निवृत्तीचा सल्ला दिला होता व वर त्यांनी वधू-वर सूचक मंडळ काढावे, असे सुचवले होते ! अंतुलेजींच्या मंत्रिमंडळमधील त्यांचे एक सहकारी जयंतराव टिळक यांच्याबरोबर त्यांची झकाझकी झाली होतीच.

मंत्री बाबासाहेब आणि मुख्यमंत्री बाबासाहेब यांच्या वर्तनात फरक पडणार आहेच. तसा तो पडलाही पाहिजे; परंतु तरीही बाबासाहेबांची अल्पकालीन मंत्रिपदाची कारकीर्द पहाता त्यांचा अगदीच पहाडिया होणार नाही, तसेच ते अंजय्यांपेक्षा जास्त पुढे जाणार नाहीत, असे वाटते. दिल्लीची एक फेरी होताच ज्या तत्परतेने त्यांनी अंतुलेजींच्याबाबत आपले धोरण सुधारून घेतले आहे ते पहाता, दिल्लीतून मुंबई नियंत्रित करण्याच्या कामी ते इंदिराजींना पूर्ण सहाय्य करतील असे वाटते. □

# प्राप्ती, एक भावनिक गरज

प्रियाळ खंडेराव कुळकर्णी, पुणे

व्यापक भ्रष्टाचार व लाचलुचपत यावर सध्या लेख, मोर्चे, भाषणे यातून खूपच गदारोळ उठविला जात आहे. पण ही तर काळाची गरजच नाही ना, हे पाहिले पाहिजे व त्यासाठी निकोप व पूर्वग्रह नसलेली दृष्टी पाहिजे. मथळ्याचा बरोबर अर्थ चाणाक्ष वाचक जाणतीलच. पण शब्दाची नीट फोड केल्याने इतरेजनांनाही माझा विचार स्पष्ट होईल.

एखाद्या व्यक्तीला उपजतच ग्रह वाईट लागले तर ते दुर्दैव जन्मभर राहते. तसे काहीसे लाच या शब्दाचे झाले आहे. त्या शब्दाला गुप्ततेचा व अनैतिकतेचा विकार कायम चिकटला आहे. तेव्हा शब्दामुळे व्यक्त होणाऱ्या व्यवहाराकडे निकोप दृष्टीने पाहावयाचे असेल तर जास्त योग्य शब्द शोधला पाहिजे. उदाहरणच घेऊन पाहू. समजा आपल्याला कोणी विचारले, 'दारू घेणार का ?' तर तुमच्या मनात किती विरोधी प्रतिक्रिया निर्माण होईल ? त्या ऐवजी 'ड्रिंक्स घेणार का ?' या प्रश्नाने तुमचे मन उजळून निघेल. तेव्हा असा योग्य शब्द आपल्या व्यवहार कोषात असताना तो विसरणे परंपरेला धरून होणार नाही. तो शब्द म्हणजे 'प्राप्ती.'

माझे लहानपण हे एका संस्थानात गेले. भोवतालची मोठी मंडळी सरकारी कचेरीत काम करणारीच असत. 'स्वच्छ लोकशाही कारभार' असे बिनबुडाचे शब्द त्या वेळी ऐकिवात नव्हते. कचेरीतील कोणत्या जागेची प्राप्ती किती याचा उहापोह आदराने व्हावयाचा. जेवढा हुद्दा मोठा तेवढी प्राप्ती अधिक, हा न्याय सर्वांना मान्य होता. समजा यमीचे लग्न ठरत आहे तर कोर्टात शिरस्तेदार असलेले गणपतराव, पत्नी सरस्वतीबाईंना सांगायचे की, स्थळ चांगले आहे. मुलगा कचेरीत अव्वल कारकुनाच्या हाताखाली उमेदवारी करतो आहे. पगार रु. अठरा असला तरी खुद्द अव्वल कारकुनांचे लक्ष आहे व प्राप्ती चांगली आहे, तेव्हा ठरवावयाला हरकत नाही. सरस्वतीबाईंनाही ते पटावयाचे कारण; त्या माऊलीला आपल्या हातातील गोठ; पाटल्या कशातून आल्या याची कल्पना असे व ती या स्थळाला आनंदाने संमती देई. मराठी भाषेपेक्षा हिंदी भाषेला डौल जास्त. तेव्हा 'आमदनी' या भारदस्त शब्दातून हा व्यवहार व्यक्त होत असे. कै. प्रेमचंदांच्या एका कथेत, तीन विवाहित बहिणी एकत्र जमतात, तेव्हा नवऱ्याच्या आमदनीवरून त्याचा मोठेपणा सिद्ध करण्याची जी बहिणींची चढाओढ लागते, त्याचे रसभरित वर्णन केले आहे. तेव्हा असा देण्या-घेण्याचा प्रश्न तुमच्यापुढे आला तर प्राप्ती किंवा आमदनी या दृष्टीतून पाहिले म्हणजे ड्रिंक्स घेण्यादेण्या सारखा हा व्यवहार सुखावह होईल.

आता योग्य शब्द मिळाल्यानंतर आपण परंपरेतून याकडे पाहू. पेशवाई दफ्तरावरून (भा. इ. सं. मं १४, पान १३२२, परिशिष्ट अ. तळटीप) असे दिसते की, नारो आप्पाजी निपुत्रिक निवर्तल्यावर त्याच्या पत्नीच्या मांडीवर आपला मुलगा चि. केशव याला दत्तक देताना काशिराम दत्तो लिहितात 'दत्तक परवानगी मिळणेसाठी सरकारी नजराणा म्हणून रु. दोन सेकडा सरकारी जमादारखान्यात भरले. त्याशिवाय कचेरीतील व दरबारातील मंडळी यांची खुशी करण्यासाठी वरकड खर्च रु. पाच सेकडा जाहले' काशिराम दत्तो यांच्या भाषेवरून या सर्व व्यवहाराबाबत कोणचीही तक्रार व कटुता दिसत नाही. निकोप दृष्टी म्हणतो, ती अशी !

आता आणखी थोडे मागे जाऊ. यातून अर्थात शिवाजीमहाराजाचा काळ सोडला पाहिजे. 'रयतेकडून लाच घेऊन गोरगरिवास नाडिले यासाठी हणमंत पाटील यास सख्त ताकीद देऊन पैसे सरकारी खजिन्यात भरावयास लाविले' वगैरे गोष्टी व्याख्यानात सांगण्यासाठी आहेत. मला असे वाटते की, शिवाजीमहाराजांचा जो अवतार झाला तो, स्वराज्यसंस्थापनेसाठी तितकासा नसून आपल्याला समारंभ करावयास व ऐतिहासिक मोठेपणाच्या गोष्टी सांगण्यासाठी विभूतीची गरज असते ती भागविण्यासाठी. तेव्हा तो काळ अपवाद समजून आचरणात आणण्याचा शिवाय 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाकरणीयं नाचरणीयं' असा पूर्वजांचा आदेश आहे. यात 'लोकविरुद्ध' म्हणजे लोकांच्या विरुद्ध असा अर्थ घ्यावयाचा नसून 'लोकाचरणाविरुद्ध' हा पाठ योग्य, हे सुज्ञ वाचक उमजतीलच!

तेव्हा तो काळ सोडून आपण मागे पाहू. वाचकांना लहानपणी वाचलेला इतिहास आठवत असेलच. देवगिरीचा किल्ला का सोडावा लागला तर कोठारात धान्याऐवजी मिठाची पोती सापडली. हीच कथा इतर किल्ल्यांच्या बाबतीत. आता धान्याऐवजी मीठ, प्राप्ती असल्याशिवाय कोण घेईल ? किल्ला शत्रूच्या हातात जाणे हा गौण मुद्दा आहे. प्राप्ती हा व्यवहार परंपरेत बसणारा आहे हे तात्पर्य !

एकदम मागे नजर टाकली तर काय आढळते ? ज्या वाचकांना बी. ए. च्या परीक्षेला 'शाकुंतल' होते त्यांना माहीतच आहे की, अंगठी सापडल्यानंतर कोळयाला पकडून द्वारपाल राजासमोर गेला. दुष्यंतराजाकडून बक्षिसी मिळाल्यानंतर मात्र त्याने त्यातील भाग हक्काने मागून शिवाय कोळयाकडून ड्रिंक्सची पार्टी उपटली. आता दुष्यंताचा काळ म्हणजे या देशाला ज्याच्यावरून भारत नाव पडले त्याच्या जन्माच्या आधीचा ! यापेक्षा जुनी परंपरा ती काय सांगावयाची ?

लेखाच्या मथळयातील 'प्राप्ती' या शब्दाचा उलगडा पूर्ण झाला व तो परंपरेला धरून आहे, याबद्दल वाचक माझ्याशी सहमत होतील. आता दुसरा शब्द 'भावनिक.' सध्या वाङ्मयात हा शब्द सारखा आढवा येत आहे. त्याची फोड कशी करावी असा प्रश्न (यक्षप्रश्न नव्हे) पडला होता. अनुभूती व्हावी तसा एका क्षणी चटदिशी मनात प्रकाश पडला. उदाहरणाने अर्थ सोपा व्हावा. पुराणे वाचताना मला नेहमी प्रश्न पडावयाचा की, आमचे सर्व देव एवढे स्तुतिप्रिय

का ? राहावयास स्वर्ग, प्यावयास अमृत व सहवासाला अप्सरा असल्यानंतर कोणता देव कशासाठी दुसऱ्या देवाची स्तुती करेल? तेव्हा स्वतःची स्तुती ऐकावी ही 'भावनिक गरज' म्हणावयास हरकत नाही. मला वाटते, माझा मुद्दा स्पष्ट झाला असावा,

या मर्त्यलोकावर राहायला, प्यायला, सहवासाला द्रव्य लागते. तेव्हा शाब्दिक स्तुती जरी प्रिय असली तरी तिचा उपयोग मर्यादितच. पूर्वी प्राप्तीची गरज, सौ.ला गोट-पाटल्या अथवा यमीच्या लग्नाच्या हुंड्याची व्यवस्था करणे एवढ्यापुरती मर्यादित होती. आता जीवन विशाल झाले आहे ! सर्व माध्यमांतून, याचि देही, याच डोळा मिळू शकणाऱ्या स्वर्गसुखांची महती गायली जात आहे. आता पगार किती जरी वाढला तरी कोणताही मनुष्य त्यातून घर-भाडे, रेशन हे खर्च भागवेल; पण 'सोनी-टू-इन-वन' घ्यायचा असेल, स्कॉच इम्पोर्टेड हवी असेल तर त्यासाठी पैसे देताना मनुष्याचा हात आखडेल; पण समजा, रस्त्यावर कोणी पाहात नसताना हजार रुपये असलेले कोरे पाकीट सापडले तर स्कॉच अथवा सोनी घेण्यातील आनंद द्विगुणित होईल! अशी पाकिटे रस्त्यावर काही मिळत नाहीत, तेव्हा अशी प्राप्ती होत राहिली तर केवळ भावनिक गरज भागेल ! लेखाच्या मथळ्याचा आता पूर्ण उलगडा झाला असे म्हणायला हरकत नाही. तेव्हा, पगाराचा पैसा व प्राप्तीचा पैसा, असे दोन वेगळे ओघ असले तर गंगा-यमुनांच्या संगमासारखे मनुष्याचे आयुष्य सुफलित होईल. हा विचार एकदा पटला की, जी वाटचाल आपण गेल्या चाळीस वर्षांत केली आहे त्याबद्दल तक्रार करण्याचे कारण उरत नाही. उलट लोकशाहीशी सुसंगत अशी भव्य वास्तू पायापासून शिखरापर्यंत उभी राहिली आहे याचे कौतुकच वाटेल !

या परिस्थितीत सुधारणा कशी शक्य आहे यावर अनेकजण आपल्या लेखण्या झिजवीत आहेत, मोर्चे काढीत आहेत व इतक्या दिवसांत लाचलुचपत निपटून काढू, अशा प्रतिज्ञा करीत आहेत. एखादी अस्तित्वात असलेली गोष्ट नष्ट करण्याचा खटाटोप करीत बसण्याऐवजी त्याला सुव्यस्थित रूप देणे हे जास्त योग्य, असे मला वाटते. सध्याच्या व्यवस्थेतील माझ्यासारख्याला जाणवते ती त्रुटी अशीः समजा, मला मुंबईला जावयाचे आहे, तर पुणे-मुंबई तिकीट रु. १२-३० हा दर छापील असतो. त्यामुळे किती पैसे लागतील, कोणास द्यावयाचे हे सर्व माहीत असते व डोक्यास ताप होत नाही; पण मला जर एक काम कचेरीत करून घ्यावयाचे असले तर कोणाला कसे भेटावे, मध्यस्थ कोण, किती पैसे खिशात ठेवावेत असे अनेक प्रश्न सतावीत असतात. त्याऐवजी तिरुपतीच्या मंदिरात जसे नारळ फोडण्यापासून महारुद्र-अभिषेक करण्यापर्यंत दर लावलेले असतात तसे वेगवेगळ्या कचेऱ्यातील खुर्च्यांचे दर ठरवून द्यावेत. सिनेमाच्या बॉक्स, फर्स्ट, सेकंड खिडक्या असतात तशा कचेरीच्या बाहेरच खिडक्या ठेवाव्यात. विंगेत बसून नाटक पाहणे हा जसा पूर्वी विशेष मान होता तसा एखाद्या मोठ्या महाशयांची भेट पाहिजे असेल तर स्पेशल रेट लावण्यास हरकत नाही. हा जो पैसा निर्माण होईल तो सर्व कर्मचाऱ्यांना दर महिन्याला पगारासारखा पत्रकावर सही करून न देता, कोऱ्या पाकिटातून, हळूच पॅडखाली अथवा ड्रॉवरमध्ये पोहोचवावा. असे झाले म्हणजे सोनी-टू-इन-वन, इम्पोर्टेड साडी, ड्रिंक्सची पार्टी असे खर्च प्राप्तीतून झाल्यामुळे आनंद वाटेल व माझ्यासारख्या सामान्य जनांची कामे डोके न शिणविता होतील !

या सर्व विचाराला आणखी व्यापक भूमिका मिळत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. कर्तव्यपूर्तीसाठी नेहमी परदेशी जाणाऱ्या आपल्या पुढाऱ्यांच्या असे निदर्शनास आले आहे की, प्राप्ती ही वैश्विक समस्या आहे व त्याचे आपल्याला असे सांगणे आहे की, देशातील परिस्थितीबद्दल लोकांनी विनाकारण चिंता करू नये. मी तर म्हणतो की, ही समस्या नसून 'कृण्वंतो विश्वम् आर्यम्' असा आमचा वेगळ्या अर्थाने का होईना, विजयच आहे ! □

## उत्तरमीमांसा : ३७ :

स. शि. भावे

# न्यायाची वाट खडतरच !

आज तीस जानेवारी. हुतात्मादिन ! बरोबर चौतीस वर्षांपूर्वी या दिवशी महात्मा गांधींचा खून झाला होता. त्यांच्या उघड्या छातीवर फुटा-दीड फुटावरून पाच गोळ्या झाडण्यात आल्या होत्या !

गांधींना, ख्रिस्ताला, हुतात्मा का म्हणायचे ? कारण सत्य आणि न्याय यांसाठी त्यांनी आपल्या प्राणाची पर्वा केली नाही म्हणून. ते हेतुवादी जगले, परिणामवादी जगले नाहीत म्हणून ! ध्येयवादी हुतात्मा आणि व्यवहारी राजकारणी यांमधील हा सरळ, स्पष्ट आणि साधा फरक आहे. पहिला हेतूच्या शुद्धतेला मानतो, दुसरा परिणामाच्या यशस्वितेला मानतो.

आजच्या दिवशी गांधीजींच्या निमित्ताने साऱ्याच हुतात्म्यांचे स्मरण करायचे असते. आज वंदनपूर्वक हे स्मरण करताना मनात येते आहे – साऱ्या हुतात्म्यांना आज जरासे समाधान वाटले असेल. कारण न्यायमूर्ति लेंटिन यांचा निकाल एव्हाना त्यांच्यापर्यंत नक्कीच पोचला असणार !

हा निकाल समजून त्यांनी समाधानाचा एक सुस्कारा सोडला असेल. निदान न्यायसंस्थेने तरी न्यायाची, सत्याची बूज राखली असे काहीसे खिन्न समाधान त्यांना वाटले असेल. निदान एक न्यायमूर्ती तरी न्यायाची बूज राखणारे व निर्भयपणे सत्ताधीशांवर ठपका ठेवणारे निघाले याचे खिन्न समाधान त्यांना वाटले असेल !

होय, या समाधानाला 'खिन्न' असेच म्हटले पाहिजे. कारण असे समाधान सध्या दुर्मिळच नव्हे, तर अदृश्यच झाले आहे ! त्यामुळे न्या. लेंटिन यांचा निकाल आणि असा हा खटला हे काही तरी अपवादाचे घडले, ही नेहमी नेहमी नियमाने घडणारी घटना नव्हे, हे लक्षात येऊन समाधान वाटले

तरी फार मोठा हुरूप वाटू शकत नाही.

न्या. लेंटिन याचा निकाल अर्जदारांच्या बाजूने लागला हे जरी खरे असले तरी न्यायालयात न्याय मिळणे किती खडतर आणि जिकिरीचे असते हे या खटल्यात स्पष्ट झाले हेही तितकेच खरे आहे !

विशेषत: सर्वसत्ताधीश शासनाविरुद्ध झगडून एखाद्या व्यक्तीला न्याय मिळवायचा असला म्हणजे हा खडतरपणा आणि ही जिकीर शतपटीनी वाढतात. केंद्राचे किंवा राज्याचे सरकार एवढीच शासनाची व्याख्या मर्यादित करण्याचे कारण नाही. कोणतेही संस्थात्मक शासन विरुद्ध व्यक्ती, असा हा झगडा नेहमीच विषम असतो.

संस्थांकडे द्रव्यबळ मोठे असते. शिवाय ते कोणा एका व्यक्तीच्या मालकीचे नसते. अशा द्रव्यबळाचा वापर नि.संकोच होऊ शकतो. व्यक्तीजवळ एवढे द्रव्य आधी नसणार आणि असले तरी ते वेचण्याची इच्छाही कमी तीव्रच असणार.

द्रव्यावर अवलंबून असणारी, पण केवळ द्रव्यबळावरच अवलंबून असते असे नाही, अशी बाब म्हणजे कायदेशीर सल्ला आणि निष्णात वकील ! उच्च दर्जाचा कायदेशीर सल्ला आणि कुशाग्र बुद्धिमत्तेचे वकील हे साधारणपणे द्रव्याकडे, सत्तेकडे, प्रतिष्ठेकडे ओढले जातात. सध्याच्या स्पर्धात्मक व्यवसाय-नीतीमुळे असे होणे स्वाभाविक आहे. पैसा, सत्ता, प्रतिष्ठा हे सारे शासकाच्या बाजूने जाणारे असल्याने ( natural affinity ) कायदेशीर सल्ला एकाच नव्हे तर अनेकांकडून मिळवणे शासकाना सोपे जाते. याउलट एका व्यक्तीला हे सारे गोळा करणे महाकठिण !

प्रस्तुत खटल्याचेच पाहा. ॲडव्होकेट जनरल ॲड. बोबडे यांनी आधी सरकारची बाजू मांडली. मग ते नको झाल्यावर बाजूला केले गेले. माजी कायदेमंत्री बॅ. अशोक सेन यांना तत्काळ पाचारण केले गेले. माजी खासदार मृणाल गोरे किंवा माजी आमदार पी. बी. सामत ही माणसे तशी सामान्य नव्हेत, तरीही त्यांना शासकांच्या झपाट्याशी स्पर्धा करता आली नसती. येथेच ॲड. अशोक देसाई यांचे महत्त्व लक्षात येते. ते आणि त्यांचे सॉलिसिटर यांनी या खटल्यात स्वत.चे शुल्क काहीही घेतले नाही आणि त्याहीपेक्षा म्हणजे सार्वजनिक हिताचे आणि केवळ सन्माननीय असे हे काम असूनही त्याकडे दुर्लक्ष केले नाही. किंबहुना अशोक देसाईंनी आपल्या कायद्याच्या विश्लेषणात आणि युक्तिवादात जी जागरूक निष्ठा आणि श्रेष्ठ पातळीचे बुद्धिवैभव प्रकट केले ते अलीकडील कायदाव्यवहारात अद्वितीय म्हणावे लागेल ! ☐

दिरंगाई करणे, मागितलेले व 'देतो' अशी कबुली दिलेले तपशील अचूक सादर न करणे, कायदेशीर तरतुदीविषयी प्राथमिक अज्ञान आहे असे दाखविणे, न्यायमूर्तींनी अस्वस्थता व्यक्त केली की आपण आश्चर्य व्यक्त करणे अथवा, न्यायमूर्तींनी पुराव्यात किंवा प्रतिपादनात विसंगती आहेत हे पुन्हा-पुन्हा स्पष्ट केल्यावरही टणकपणाने त्याकडे थंड दुर्लक्ष करणे इत्यादी उपायांनी मूळ अर्जदाराना आणि प्रसंगी न्यायालयालाही जेरीस आणणे, वैतागवणे आणि शक्य तर अशा वैतागात त्यांचा शांतपणा आणि विवेक ढळविणे– असे योजनाबद्ध उद्योग सारेच शासक करीत असतात. अशा उद्योगाना वकील सामील असतात किंवा तेच, डावपेच म्हणून, असे उद्योग करायला शासकाना सुचवितात. अशा उद्योगाना कायद्याच्या प्रक्रियेत अडवताही येत नाही. म्हणून अशा उपायांनी न्याय मागणाऱ्याला कठोरपणाने पण अलगद गांजता येते. अनेक न्याय मागणारे या छळातच कामी येतात.

प्रस्तुत खटल्यात प्रतिवादींनी–सरकारने–स्वत.चे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आधी दिरंगाई केली. मुदतवाढी मागून घेतल्या. नंतर प्रत्यक्ष सुनावणी चालू असताना मूळ प्रतिज्ञापत्र बदलून दुसरे नवे सादर करण्याची अभूतपूर्व विनंती केली आणि अशा टंगळमंगळीनतर, तसेच बदलावदलीनंतर, जे प्रतिज्ञापत्र सादर झाले त्यात वस्तुस्थिती प्रतिबिंबित झालेली नाही, असे शेवटी सिद्ध झाले !


जे प्रतिज्ञापत्राचे तेच खात्यातील फायलींचे! या फायली येण्यासही प्रथम विलंबच झाला. नंतर ज्या आल्या त्या अपुऱ्या कागदाच्या आणि तपशिलाबाबत संकोचवृत्तीच्या अशा आल्या. न्यायमूर्तींना फायलीबाबत वेळोवेळी मागण्या कराव्या लागल्या व शेवटी ताकीद द्यावी लागली. काही महत्त्वाचे कागद फायलीत नाहीत व आहेत ते कागद क्रमाने व्यवस्थित लावलेले नाहीत, असा प्रकार न्यायमूर्तींना प्रत्यक्ष निरीक्षणात आढळला !

जी आकडेवारी, जे तक्ते, ज्या याद्या, न्यायमूर्तींनी मुद्दाम मागितल्या होत्या त्या पुरवण्यातही दिरंगाई आणि ढिसाळपणा हीच पद्धती दिसून आली. आकडे सगळीकडे तेच नव्हते. बेरजा चुकलेल्या होत्या. एक यादी दुसरीशी जुळत नव्हती. या गोंधळामुळे न्यायमूर्ती वैतागले ! क्वचित्, 'हे सारे काम आपण इथे न्यायालयात करायचे आहे काय ?' असे त्यांनी संतापून विचारलेही; पण असा गोंधळ मुद्दाम केला जातो आहे, असे काही ते म्हणू शकले नाहीत. कारण कायद्याच्या कार्यपद्धतीची मर्यादा !

शासकांना ही मर्यादा चांगली ठाऊक असते. केवळ उशीर, केवळ गोंधळ, केवळ चुका हे सारे अहेतुक (Bonafide) असू शकते आणि त्या चुकाची जबाबदारी त्या त्या कर्मचाऱ्यांची ठरते. म्हणून न्यायदानाच्या कामात अडथळा, असे त्याचे स्वरूप ठरू शकत नाही. अर्थात अशा चुकांमुळे न्यायदानात विक्षेप येतो. न्यायदानाला उशीर होतो. अन्यायनिवारणासाठी दाद मागितलेल्याचे खटले बारा-बारा वर्षे चालल्याची उदाहरणे आपण वाचतो. बारा-बारा वर्षांनंतर मिळालेला न्याय हा न्याय राहत नाही, हे ध्यानात घेऊन 'कार्यपद्धतीच्या कायद्यात' (Procedural law) काही महत्त्वाचे बदल होणे आवश्यक आहे, हे या खटल्याने स्पष्ट झाले आहे.

अन्यायाविरुद्ध दाद मागणाऱ्या साधारणपणे व्यक्ती असतात आणि ज्यांच्या निर्णयाविरुद्ध दाद मागायची असते ते बडे शासक असतात. पैशाची, माणूसबळाची, विविध साधनसामग्रीची सुविधा व्यक्तीपेक्षा शासकाकडे किती तरी पटीनी अधिक असते. कायद्याच्या कार्यपद्धतीतील तरतुदी त्वरित पूर्ण करणे हे व्यक्तीपेक्षा शासकाना केव्हाही अधिक सुलभ असते. प्रत्यक्षात मात्र अनेकदा असे आढळते की, दाद मागणारी व्यक्ती, न्याय मिळण्याची निकड असल्याने, कायद्यातील साऱ्या तरतुदी तातडीने आणि बिनचूक पुऱ्या करण्यासाठी धडपडत असते आणि याउलट प्रतिवादी शासक मात्र शांत, निवांत असतात ! त्यांच्या सुसज्ज सुविधाही तशाच शांत राहतात. दिरंगाई आणि चुका अशा 'नैसर्गिक' कारणानी न्यायदानाचे काम मात्र लावत जाते.

'अमुक एका याचिकेचा निकाल अमुक एका मुदतीत लावला पाहिजे', असे बंधन घालून ही दिरगाई टाळण्याचा प्रयत्न कायदा खाते करते. क्षेत्रविशिष्ट न्यायालये स्थापन करूनही अशी दिरंगाई टाळण्याचा


आपण न्याय्य सामाजिक व्यवस्था स्थापन
व्हावी म्हणून कार्य करूं या. उद्दिष्टांबाबतचे
एकमत आणि कठिण परिश्रम तसेंच सहकार्यानेंच
केवळ हें शक्य आहे.
एक राष्ट्र
एक लोक
davp 81/280

प्रयत्न अनेकदा विफल होताना दिसतात. 'नैसर्गिक कारण' हा उपाय येथे दिरंगाईसाठी वापरला जात आहे असे दिसते; पण त्यावर आक्षेप मात्र घेता येत नाही.

अर्जदार बिचारा प्रतिकूल परिस्थितीत असतो. अशा अवस्थेत चिकाटी आणि सहनशीलता यांचीच कास अशा व्यक्तीला धरावी लागते. न्याय आपल्याच बाजूला आहे, हा विश्वास त्याला अशा चिकाटीसाठी आणि सहनशीलतेसाठी लागणारे सामर्थ्य देत असतो. अशा प्रसंगी, दाद मागणाऱ्या व्यक्तीला सर्व बाजूंनी साह्य देणे हे आपणा सर्वांचे सामाजिक कर्तव्य ठरते. हे कर्तव्य आपण जेवढ्या नेकीने बजावू तेवढे दाद मागणाऱ्याचे बळ वाढत जाते.

प्रस्तुत खटल्यास मृणाल गोरे आणि पी. बी. सामंत याचे बळ असे सतत वाढते होते. हजारो व्यक्तींचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष आधार त्यांचेमागे होते. येथे पक्षोपपक्ष अथवा हा पक्ष आपला, हा विरोधी असा प्रश्नच नव्हता. लोकजीवनातील शुद्धतेचा हा प्रश्न होता आणि या प्रश्नाची आच प्रत्येक व्यक्तीला स्वतःची म्हणून लागत होती.

त्यांचे भाग्य मोठे म्हणून त्यांना ॲडव्होकेट अशोक देसाई यांसारखे निष्णात आणि निष्ठावान कायदेपंडित मिळाले! उत्तुंग बुद्धिमत्तेबरोबर अभिजात विनोदबुद्धी असलेले अशोक देसाई प्रस्तुत खटल्यात आरंभापासून अत्यंत दक्ष राहिले, याची विशेष नोंद करायला हवी. सॉलिसिटर्सनी केस तयार करून दिली, मदतनीस वकिलांनी तपशील तपासला आणि ज्येष्ठ वकिलाने आयत्या वेळी हजर राहून आपले वक्तृत्व आणि वादकौशल्य तेवढे वापरले, असे येथे झाले नाही. सारा तपशील देसाईंनी स्वतः काटेकोर नजरेने पाहिला होता. इतका की, तो जवळ जवळ त्यांचा पाठच झाला होता. फार कमी वेळा त्यांना टिपणांकडे पाहावे लागले वा मदतनिसाना विचारावे लागले.

विशेष म्हणजे, प्रतिवादीच्या दिरंगाईकडे आणि चुका–गोंधळाकडे त्यांचे बारीक लक्ष होते. या दिरंगाईमागे व चुका–गोंधळामागे जी संगती होती त्या संगतीची दिशा त्यांनी प्रत्येक वेळी, त्याच त्या सदासतेज दक्षतेने, न्यायासनापुढे स्पष्ट केली. न्यायासनाने शेवटी 'संबंध' (nexus) सिद्ध झाल्याचा जो महत्त्वाचा आणि गंभीर निष्कर्ष काढला त्या निष्कर्षाला देसाईंनी वेळोवेळी स्पष्ट केलेल्या या दिशेची महत्त्वाची मदत झाली असणार! साध्या भाषेत हे सांगायचे तर, 'तुमच्यापाशी सारा खरा पुरावा आहे असे म्हणता ना? मग तो दाखवायला एवढी खळखळ का करता?' अशा प्रश्नाची ही दिशा होती. अशी खळखळ सतत आणि एकाच दिशेने होत आहे असे दिसले तर अपराध (malice) नव्हे, पण कल (bias) सूचित होऊ शकतो. हा कल सुचविण्याचे काम ॲडव्होकेट देसाईंनी दक्षतेने केले.

त्यांची आणखी विशेष महत्त्वाची कामगिरी म्हणजे, अर्जदारांच्या मागणीची त्यांनी केलेली कायदेशीर रचना. परवाने आणि देणग्या यांचा परस्परसंबंध पूर्णतया सिद्ध करण्याची जबाबदारी (onus) अर्जदारावर आहे, हे त्यांनी यशस्वी रीतीने नाकारले. प्रतिवादी ही जबाबदारी त्यांचेवर टाकू बघत होते. यासाठी प्रथमपासून त्यांनी प्रतिज्ञा–पत्रकाचा आग्रह धरला होता. ते येण्यास दिरंगाई झाली तरी त्यांनी तक्रार केली नाही. म्हणजे, नाराजी दाखविली; पण तक्रार केली नाही. शांतपणाने त्यांनी प्रतिज्ञापत्राची वाट पाहिली. प्रतिज्ञापत्र आले आणि देसाईंना हवे ते मिळाले! 'परवाना व देणगी यांचा कधीच संबंध आलेला नाही,' असे विधान प्रतिज्ञापत्रात होते. हे विधान देसाईंनी पकडले. त्यांनी प्रतिपादनात सांगितले की, 'अशा संबंधाचे एक जरी उदाहरण आम्ही सिद्ध करू शकलो तरी प्रतिज्ञापत्र अवास्तव आहे, हे सिद्ध होईल!' या तर्कशुद्धतेमुळे निरपवाद प्रतिज्ञापत्र सिद्ध करण्याची जबाबदारी प्रतिज्ञापत्र दाखल करणाऱ्यांवर म्हणजे प्रतिवादीवर पडली. त्यांनीच केलेल्या चुकांमुळे आणि गोंधळामुळे त्यांना ही जबाबदारी पार पाडता आली नाही. अशोक देसाईंची कायदेशीर डावपेचाची आखणी अशा रीतीने उच्च पातळीची आणि बिनतोड होती! त्यांचे प्राविण्य, दक्षता, प्रतिपादनकौशल्य आणि मुख्य म्हणजे, कार्याच्या व्यापक महत्त्वाची जाणीव व निष्ठा या गुणाबद्दल त्यांचा गौरवच करायला हवा! याशिवाय हे सारे काम त्यांनी केवळ कर्तव्यबुद्धीने केले, त्याबद्दल एक पैसाही त्यांनी किंवा त्यांच्या सॉलिसिटरांनी घेतला नाही; यापुढे गौरव भावनेला आदराची जोड मिळते.

(प्रतिवादींना वकील व इतर खर्च मिळून कायद्याचा खर्च किती आला हे कुणी तरी आमदारांनी विचारले पाहिजे आणि जनतेला माहीत करून दिले पाहिजे. म्हणजे शासकाच्या बचावासाठी सामान्य जनतेचा पैसा किती व कसा भरमसाठ खर्च होतो, हे प्रकट होईल आणि जनतेची या बाबतची जागरूकता वाढेल.)

¤

प्रतिवादींनी प्रारंभी दिरंगाई, चुका व गोंधळ यांचा आधार घेतला खरा, पण शेवटी ही तात्पुरती चतुराई, त्यांच्या विरोधी ठरली. याचे मोठे श्रेय न्यायमूर्ती लेंटिन याना आहे. हा खटला चालविताना आरंभापासूनच त्यांनी उच्च न्यायदृष्टी ठेवली होती. 'कार्यपद्धतीपेक्षा कायद्याचे तत्त्व मोठे आणि विशिष्ट कायद्याच्या तत्त्वाला आधार असा जो न्याय, तो सर्वाधिक महत्त्वाचा', हे त्यांच्या निकालपत्रातील सूत्र आहे.

कार्यपद्धती तर बरोबर हवीच. न्या. लेंटिन यांनी याबाबत कसलाही पक्षपात न करता दोन्ही बाजूकडून समान कार्यक्षमतेचा आग्रह धरला हे, प्रस्तुत खटल्याचे कामकाज अथवा निकालपत्र व्यवस्थित पाहणाऱ्या कोणालाही स्पष्ट होईल. त्यांनी असा आग्रह धरला म्हणून कोणती बाजू पडती आहे ते अलगद स्पष्ट झाले.

३१ मार्च '८१च्या परिपत्रकाच्या अंमलबजावणीचा आग्रह त्यांनी धरला आणि सर्व प्रकारच्या सिमेंट-वाटपाला सदर परिपत्रक बंधनकारक आहे, असे ठरविले; यात कायद्याच्या तत्त्वाबाबतचा त्यांचा आग्रह दिसून येतो आणि परवाने व देणग्या यांचा परस्पर संबंध सिद्ध होतो, हे (nexus) त्यांनी मानले, यात त्यांची मूलभूत न्यायतत्त्वाशी असलेली बांधिलकी दिसून येते. भाषेचे विविध उपयोग आणि त्यातून व्यक्त होणाऱ्या भिन्न अर्थच्छटा यांची छाननी करून खरा अभिप्रेत अर्थ कसा निश्चित करावा, याचाही एक चांगला वस्तुपाठ त्यांच्या निकालपत्रात मिळतो...आणि या साऱ्या गुणसंपदेला अभिजात तेज मिळाले ते न्यायसंस्था व न्यायविषयांवरील त्यांच्या अविचल निष्ठेने आणि कर्तव्यभावनेने. या तेजासाठी न्या. लेंटिन यांच्याबद्दल कोणीही नम्रपणे आदरभाव बाळगील यात शंका नाही.

¤

असा हा नुकताच झालेला न्यायाचा विजय आज हुतात्मादिनी तो आठवावा हे स्वाभाविकच आणि सुरवातीस म्हटल्याप्रमाणे तो आठवताना खिन्न वाटावे, हेही स्वाभाविकच.

पाहा ना. साधी, सरळ गोष्ट असते. पण ती न्यायालयात जाऊन सिद्ध करावी लागते. न्यायालयाचा मार्ग हा फार बिकट, खडतर असतो. या मार्गात सामान्य माणूस किती टिकणार? आणि त्याला न्याय तरी केव्हा मिळणार?

आणखी एक खिन्नता: विधिमंडळ, शासन आणि न्यायसंस्था या तीन शाखांपैकी आज न्याय मिळण्याचा संभव फक्त न्यायसंस्थेतच असावा आणि तोही अपवादात्मक, ही स्थिती आपल्या समाजाबद्दल काय सांगते? याचा सविस्तर विचार एकदा स्वतंत्रपणे करायला हवा. □

गांधी खूनखटल्यातील एक आरोपी, ग्वाल्हेरचे डॉ. परचुरे यांचे वकील श्री. पु. ल. इनामदार यांची 'लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी' ही लेखमाला १९७६ मध्ये 'माणूस'मधून क्रमशः येत होती. नंतर लगेच ती पुस्तकरूपानेही प्रसिद्ध झाली.

लेखमालेत व पुस्तकात त्या वेळी न आलेल्या बऱ्याच घटना, प्रसंग, आठवणी श्री. पु. ल. इनामदार भेटल्यावर सांगत असतात. इतिहास म्हणून या घटनांना–आठवणींना किती मोल आहे हे वेगळे सांगायला नकोच !

सगळ्या नाहीत तरी काही आठवणी–घटना–अनुभव–प्रसंग श्री. पु. ल. इनामदार यांनी येथे शब्दांकित केले आहेत.

मूळ पुस्तक व लेखमाला ज्यांना आवडली होती त्यांनाच केवळ नाही तर खराखुरा इतिहास ज्यांना समजावून घ्यायचा आहे अशा सर्वांनाच ही इनामदारांची क्षणचित्रे उद्बोधक वाटतील.

पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर त्याचे स्वागत कसे आले ?

२।३ अभिप्राय पाहण्यासारखे आहेत.

टाइम्स ऑफ इंडियाचे वार्ताहर लिहितात–

☐ कहाणी खरोखरच उत्कृष्ट उतरली आहे. त्या (अभियोगाचे वेळी) माझ्या कल्पनेतही न आलेल्या काही कूट प्रश्नांची उत्तरे तुमच्या (इनामदारांच्या) कहाणीवरून मिळाली.

तुमच्या कहाणीची एक अपूर्वाई मला प्रकर्षाने जाणवली. सर्व कहाणी निर्मळ मराठी आणि तीही संस्कृतप्रचुर अशा भाषेत गुंफली आहे. कायद्याच्या व्यवहारात लागणाऱ्या इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्द तितक्याच मोलाचा व तोलाचा मिळू शकतो हे तुम्ही दाखवून दिले आहे.

कहाणी–निवेदनाच्या ओघात तुम्ही अनेक व्यक्तिचित्रे सरसपणे रंगविली आहेत. दफ्तरी, आत्माचरण ही व्यक्तिचित्रे मला मोहविती झाली.

नथूरामविषयी तुम्ही जे काही लिहिले ते मला तंतोतंत पटले. लाल किल्ल्यात त्याला (मी) प्रत्यक्ष पाहिल्यावेळी माझेही तेच विचार होते !

–श्री. य. द. लोकूरकर, 'लीगल कॉरस्पॉन्डन्ट', टाईम्स ऑफ इंडिया, दि. ११–११–७६

☐ " P. L. Inamdar is an excellant narratar. In his capable hands the entire story of the Red Fort Trial emerges in all its magnificent drama. I have found it hard to put the book down, hesitant as I was to begin it, having covered the trial myself. Even Nathuram emerges as a heroic figure. And no wonder Inamdar has quoted from Godse's address to the Court in which he prayed for swift execution......Godse's behaviour through out was so unimpeachable that after he finished his speech with the prayer " Namaste Sadaa Vatsale Matrubhoome " and bowed to the Hon'ble Justices on the Bench, there was hardly a person who had no tears in his eyes. Inamdar has written a story, so to speak from the inside. "

–M. V. KAMAT in Illustrated Weekly of India, Dated 10–4–1980

'ललित' मासिक, मुंबई, अंक एप्रिल १९७७मध्ये, 'ललितची शिफारस' या शीर्षकात श्री. ज. जोशी लिहितात–

☐ गांधीवधाच्या घटनेबद्दल अनेकानी लिहिले आहे. (त्या खटल्यातील आरोपी) डॉ. परचुरे यांचे वकील श्रीयुत पु. ल. इनामदार यांनी लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी हे अप्रतिम पुस्तक लिहून अशा खटल्यामध्ये भाग घेणाऱ्या वकिलाच्या मनाची कशी उलघाल होते याचे विश्लेषण समर्थपणे केले आहे. हे पुस्तक बऱ्याच दृष्टीनी असामान्य आहे. एखाद्या वकिलाने स्वतः चालविलेल्या मोठ्या खटल्याविषयी लिहिलेले असे हे मराठीतील पहिलेच पुस्तक असावे...... (इनामदारांना) मराठी लिहिण्याचा सराव नसताना श्री. इनामदार यांनी भाषेचा वापर कौशल्याने केला आहे आणि प्रसगानुरूप तिच्यामध्ये रग आणि रस निर्माण करण्यात ते यशस्वी झाले आहेत हे आश्चर्यकारक आहे .....इनामदार हे

गांधीद्वेषी नसूनही त्यांनी हा खटला स्वीकारला यामध्येही नाट्य आहे. त्यामुळेच त्यांच्या लिहिण्याला धार चढली आहे.... कहाणीतल्या (सर्व महत्त्वाच्या व्यक्तींची) व्यक्तिचित्रणे करण्यात इनामदार फार यशस्वी झाले आहेत......इनामदारांनी (सावरकरांचे) जसे भेदक आणि वास्तव चित्र काढले आहे तसे दुसऱ्या कोणीही काढले नसेल......वेळोवेळी नाथूरामच्या धैर्याबद्दल व शांत स्वभावाबद्दल इनामदारांनी भावपूर्ण उद्‌गार काढले आहेत. .......श्री. ल. ब. भोपटकर, न्या. आत्माचरण, किंवा सरकारी वकील दफ्तरी यांच्या चित्रणातही दोन-चार वाक्यांत रंग भरण्यात इनामदार यशस्वी झाले आहेत. त्यांच्या (इनामदारांच्या) दृष्टीतून काहीच सुटत नाही. कोर्टात कोण कसे बसले होते, प्रेक्षकांतील लोक काय करत होते, साक्षीदार कुणाकडे पहात होता, न्या. आत्माचरण यांच्या मनात काय चालले असावे वगैरे गोष्टी ते तपशीलवार आणि बिनचूक वर्णन करतात व त्यामुळे कथनात रंग भरतो.......कामकाजाविषयी सांगताना ते मराठी शब्द आवर्जून वापरतात.......(परंतु) ते कहाणीच्या प्रवाहात चपखल बसतात हे मुद्दाम आवर्जून सांगावयास हवे...(इनामदारांचे) लिखाण ताजेतवाने वाटते. श्री. इनामदार यांनी ह्या पुस्तकात कसलेल्या लेखकावरही कडी केली आहे... इतके उत्तम आणि माहितीपूर्ण पुस्तक......

पुढील काही 'क्षणचित्रे' या माहितीत आणखी थोडी भर घालत आहेत...

# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी...क्षणचित्रे

## पु. ल. इनामदार

### आयकराची कटकट

मे १९४९ च्या चौथ्या आठवड्यातली आठवण आहे. आम्ही सर्व वकीलमंडळी संध्याकाळच्या वेळी एका ठिकाणी चहापार्टीला जमलो होतो. तेथे मांडलेल्या सोफा-खुर्च्यांच्या अनेक वर्तुळांपैकी एका वर्तुळात दोन-तीन फुटावर असलेल्या माझ्याजवळच्या सोफावर माननीय न्यायमूर्ती बसले होते. त्यांच्याशेजारी एक श्रेष्ठ अॅडव्होकेट बसले होते. त्या दोघांमधे माझ्यासमोर झालेला संवाद असा–

'मला तुमचा सल्ला हवा आहे. मला स्वत:ला काय करावे ते समजत नाही. तुमचा अनुभव काय आहे तो मला सांगाल का?'

'हो, हो! अवश्य! काय आहे समस्या?'

'अहो,! मी लवकरच निवृत्त होणार आहे नि मग अर्थातच माझा विचार पुन्हा स्वतः वकिली करायचा आहे. भारत सरकार मला एका प्रकरणाचे काम–एका आर्बिट्रेशन प्रकरणामध्ये–मला वकीलपत्र देणार आहे–दिलेच आहे. हे पत्र आले आहे.'

'असे का? चागले झाले मग!'

'ते सर्व ठीक आहे हो! पण पत्राबरोबर त्यांनी माझ्या वकीलकीचा चेक पाठवला आहे तो हा बघा! आहे...हजारांचा; पण यामधून आयकराची किती रकम वसूल होईल? माझ्या हातात काय पडेल? तुमचा स्वतःचा काय अनुभव आहे?'

'अहो,! ते काही विचारू नका.हे आकडे दिसायला मोठे चांगले-सोपबबल–साबणाच्या फुग्यासारखे; पण धरले तर हातात काही रहात नाही. हात ओला मात्र होतो!'

'तरी पण?'

'माझ्या हातात वार्षिक आयमधून शेकडा जेमतेम पंधरा रुपये दहा आणे येतात!'

'करविमुक्त दैनिक भत्ता–राहणीखर्च मिळाला तर काही वाईट नाही!'

निवृत्त न्यायाधिशासाठी आयुक्त–आयोग–अधिकरणे–अभिभाषणे अमर असोत!

पण असे अहेर निवृत्त होण्यापूर्वीच?

### नुसतेच पागोटे!

गाधीजीना गोळ्या घातलेल्या पिस्तुलाच्या मालकीबद्दल ग्वाल्हेर शहरात वावड्यांचे पीक फुटले होते. अभियोग पक्षाचा साक्षीदार जगदीश गोयल याच्या डोक्यावर मनुष्यवधाच्या आरोपाची तलवार टांगती ठेवून करवलेली त्याची जबानी अगदी अविश्वसनीय दिसत होती. अभियोग-पक्षाने बाकीचे तीन साक्षीदार सोडून दिले होते. त्या दिवसांत पिस्तुल कुणाचे असावे याबद्दल निरनिराळे तर्क–कुतर्क बोलले जात होते. मी स्वतः सचित होतोच. त्याच दिवसातली गोष्ट!

मी आठवड्याच्या सुटीत ग्वाल्हेरला आलो होतो. आल्याबरोबर निरोप मिळाला की 'बुवासाहेबांनी' बोलावले आहे. पानिपतच्या जनकोजी–दत्ताजीच्या नावावर आपल्या जातिनामाची 'मरहट्टे यानी मरकरही हटेंगे!' म्हणून व्युत्पत्ती सांगणाऱ्या लोकांना ग्वाल्हेरमध्ये 'बुवासाहेब' म्हणण्याची पद्धत आहे. अशाच एका बुवासाहेबांच्या वाड्यावर मी गेलो. खाजगीमधल्या माडीवर बुवासाहेब कंगणीदार पिळाचे पागोटे घालून बसले होते. मुजऱ्या–नमस्काराची देवघेव झाल्यावर मला जे सांगण्यात आले त्यावरून बुवासाहेबांचे हितशत्रू पिस्तुलाची मालकी बुवासाहेबांवर थापण्याच्या प्रयत्नात होते आणि त्या शंकाभयाने बुवासाहेबांचा धैर्यमार्तण्ड इतका तापहीन झाला

होता की, विरघळू लागलेला बर्फच ! अभियोग पक्षाची पिस्तुलाच्या मालकीची कहाणी अशी कुठेच नव्हती नि त्याबाबतीतला पुरावाही संपला होता वगैरे सांगून मी बुवासाहेबांचे भयहरण करण्याचा सगळा प्रयत्न केला; तरी पण शेवटी बुवासाहेबांनी स्वतःच्या डोईचे पागोटे माझ्यासमोर धरले व म्हटले, 'वकीलसाहेब ! माझी लाज राखा ! वेळ आली तर तुम्हीच मला वाचवू शकाल !'

विनाधार वावडयांच्या आणि बेछूट विधानांच्या प्रचारावर पोसले जाणारे भीतीचे राजकारण पूर्वी देशी संस्थानांमधून स्वार्थपूर्तीसाठी केवळ परार्थहानीसाठीही खेळले जाई; परंतु स्वातंत्र्योत्तर काळात ३० जानेवारी १९४८ नंतर भीतीचे राजकारण जे सुरू झाले ते अजूनही संपण्याची खात्री वाटत नाही !

## तेथे तेथे–आमच्या इथेही !

१९४८–४९ च्या दिवसांत दिल्लीला किंवा इतर शहरांतूनही लोक आम्हाला भेटत. त्या बहुतेक शहरांमधून एखादा तरी असे सांगत येई की,

'गुप्त गोष्ट सागतो–कुणाला सांगू नका हं ! हा नथूराम गांधीजीना मारण्यापूर्वी आमच्या गावीही येऊन चांगला आठ दिवस राहिला होता. तो ज्यांच्याकडे राहिला होता, त्यांच्या मुलाच्या मित्राने ही गुप्त बातमी सांगितली ! कमाल आहे बुवा या माणसाची ! कुठे कुठे हिंडला आहे गांधीजीना मारण्यापूर्वी !'

'अहो, मी चक्क बघितला ना तो नथूरामच होता ! मुळीच शंका नाही !'

'अहो, त्या...मधल्या हॉटेलमध्ये चहा पिताना मी त्याला स्वतः बघितले. त्याच्याबरोबर आपटेही होता !'

'अहो नाथूराम चहा पीत नाही !'

'नसेल हो–चहा नसेल–कॉफी पीत असेल. कदाचित नुसतं पाणीच...पण होता तोच–नक्की–मी या डोळ्यानी बघितला ना !'

या सगळया लोकांच्या माहितीवरून म्हणता येईल की, नथूराम ३० जानेवारी १९४८ पूर्वी अलवार, जयपूर, कोटा, अहमदाबाद, सुरत, उज्जयिनी, इंदूर, जबलपूर, अलाहाबाद, वाराणसी, लखनौ, पटना, कलकत्ता, जगन्नाथपुरी, नागपूर, शेगाव, मनमाड, अहमदनगर, सांगली, कोल्हापूर, मिरज, बेळगाव, वाई...सगळया ठिकाणी गेला होता ! मी नथूरामला थट्टेने म्हणे, '३० जानेवारीच्या अगोदर तुमच्या पायावर फिरतीचे नक्षत्र पडले होते की काय ? कुठे कुठे लोकांनी तुम्हाला स्वतःच्या डोळयांनी प्रत्यक्ष बघितले !'

## नथूरामचा समारोप, १२–५–१९४९

नथूरामच्या टिपण वहीमधून –

'मदन–अभागी पंजाबचा सुपुत्र (उमलती कळी)
उमदा राजबिंडा तरुण–
अत्यंत निःस्वार्थी
पाकिस्तानमधूनही अत्यंत हाल-अपेष्टा
भोगून बाहेर आलेला
येथेही निराधार
आणि आता जन्मभर कैदेत
त्याचे अपराधाला सर्वस्वी मी कारण आहे.
मला आधी जन्मठेप नि नंतर मृत्युदंड
अशी शिक्षा द्यावी.
मदनला अधिकाधिक सात वर्षे
शिक्षा देणे शक्य आहे.'

## कोर्टातला बॉंब

एकमेकांच्या स्वाक्षऱ्या करून घेण्याचे दिवस होते. ज्येष्ठ–श्रेष्ठ मंडळीच्या स्वाक्षऱ्या मिळवायच्या आणि त्यांनी दिलेल्या स्वाक्षऱ्या एकमेकांना त्या दाखवून एकमेकांच्या प्रतिक्रिया ऐकण्याची धमाल असायची. दुपारच्या मध्यंतरात आम्ही पाच-सहाजण घोळका करून एका ज्येष्ठ सहयोगी बंधूजवळ उभे राहून गप्पा-गोष्टी करीत होतो. इतक्यात आमच्यापैकी एकजात ऑफिसरूमच्या दारामधून उड्या मारीतच बाहेर आले. स्वाक्षरीपुस्तिका बोटामधे उघडीच धरून विजयाची पताका फडकावीत ते आले व म्हणाले, 'मिस्टर...! पहा, पहा. मी केवढे मिलियन डॉलर प्राईज-मौल्यवान बक्षीस मिळवले आहे !' असे म्हणून त्यांनी आमच्या ज्येष्ठ बंधूच्या हातात ती उघडी स्वाक्षरी पुस्तिका बघायला–वाचायला दिली. ज्येष्ठ बंधूंनी त्या उघडया पानाकडे बघितले मात्र, नि मोठयाने वाचायला सुरुवात केली. 'मी महात्मा नाही, केवळ आत्मा आहे...पण मला नुस्ते दोनच चरण नाहीत. पुरे चार आहेत !... आत्माचरण, दस्तुरखुद्द !'

ते ऐकून आमच्या हसण्याचा कल्लोळ एवढा झाला की ऑफिसरूममधून कोर्टाचा शिपाई धावतच हे बघायला बाहेर आला की, कोर्टामधे आरडाओरडा का झाला ? कुठे बॉम्ब-स्फोट तर नाही झाला ?

मी स्वाक्षरी पुस्तिकेत डोकावून बघितले. तर तेथे लिहिले होते, 'I am not Mahatma and only Atma...Atmacharan !'

## नथूरामचा समारोप, १२–५–१९४९

नथूरामच्या टिपण वहीमधून –

'कट आहे असे आपले मत पडले तरी
श्री. आपटे याचेविषयी खालील कारणाने
विचार करता येईल.
दयेला न्यायालयात फारसे स्थान नाही, पण थोडेसे आहे.
आपटे माझ्यापासून विभक्त कशावरून झाला नाही ?
आपटे मला प्रेरणा देऊ शकत नाही.
मला बनवू शकत नाही.
माझा आणि त्याचा अपराध सारखा होऊ
शकत नाही. तो कमी अपराधी आहे.
३०२ छेदक जन्मठेपही देऊ शकतो.
आपटे तरुण आहे. त्याची तरुण पत्नी
आणि लहान मुलगा विचारात घ्यावा आणि
दयेचा थोडया प्रमाणात उपयोग करुन आपटे
यांना जन्मठेप द्यावी.
निर्बंधाचे दंडकासाठी माझा बळी आहेच.
तेव्हा तीही अडचण नाही.'

## विभाजन आणि भारतीय नेते

वकिलीचा व्यवसाय करताना समाजजीवनाच्या धारणेकरता न्यायाला उचलून धरताना व अन्यायाचा प्रतिकार करताना मला अबोध बालकाच्या निरागस मनाने खरे बोलणारे लोक भेटत, तसेच जाणत्या मनाने शपथेवर खोटे बोलणारेही भेटत. मला अशा व्यक्तींची परीक्षणे करणे कठीण वाटायचे नाही, परंतु स्वतःच्या मनाशी अप्रामाणिक असणाऱ्या पण न्यायाचा, सत्यवादीपणाचा मुखवटा मिरविणाऱ्या माणसांपुढे हात टेकण्याची वेळ आल्यासारखे वाटायचे. लाल किल्ल्यातील न्यायालयात आलेल्या साक्षीदारांत अशा 'सत्य व अहिंसे'च्या वृत्तीचा वेष पांघरणाऱ्या अप्रामाणिक मंडळींचा तुटवडा नव्हता. एकदा या विषयावर माझे विचार मी नथूरामला बोलून दाखविले; परंतु माझ्या मनात सलणाऱ्या व्यक्तींपैकी एकाचाही संकेत मी बोलून दाखवला नव्हता. नथूरामने माझ्या विचाराशी सहमत असल्याचे सांगताना कोणाचे नाव घ्यावे? माझ्या मनात सलणाऱ्या एखाद्या साक्षीदाराचे? त्याने कोणा साक्षीदाराचे नाव न घेता बऱ्याचशा 'बड्या' लोकांची नावे घेऊन म्हटले होते की, 'ही सगळी मंडळी निरनिराळ्या हेतूंनी व मानाने स्वतःच्या मनाशी अप्रामाणिक आहेत; परंतु हीच मंडळी मुत्सद्दी, राजनीतिज्ञ; राजकारणी, द्रष्टे म्हणून गौरविली जात आहेत. ह्या लोकांचे वर्चस्व गौरवामध्ये असते आणि त्यापायी ती स्वतःच्या ध्येयोद्दिष्टांचाही सौदा करायला मागे-पुढे पहात नाहीत. ब्रिटिशांच्या गुलामगिरीमुळे या राजनीतीला आणखी एक स्वरूप आले आहे. परकीयांनी केलेला गौरव हाच खरा गौरव, अशी या मुत्सद्दी मंडळींची समजूत झाली आहे व त्यापायी ही मंडळी स्वजनद्रोह करायलाही तयार होतात. हीच मंडळी सत्तेसाठी हपापलेली होती व ह्यांच्याच अप्रामाणिक राजनीतीमुळे भारताचे निर्घृण विभाजन झाले आहे!'

नथूरामचे हे म्हणणे आठवले म्हणजे सुचत नाहीसे होऊन मी स्वतःशी म्हणतो, 'परमेश्वरा! अजूनही झेलमपासून कावेरीपर्यंतच्या गंगा-यमुनादी नद्यांच्या पाण्याने सुजल, सुफल, मलयजशीतल, सस्यश्यामला होणाऱ्या आमच्या भरतभूमीला वाचव! तिचे रक्षण कर!'

## बिर्ला भवनातील 'हे राम!'

अभियोग साक्षी क्रमांक ३१ : नंदलाल नाथालाल मेहेता याच्या दिनांक ९-७-१९४८ च्या परीक्षणामधून–

'गांधीजी दिल्लीला असले म्हणजे मी त्यांच्या सेवेसी असे. मी ३० जानेवारी १९४८ रोजी बिर्ला भवनात होतो,...मी हत्याऱ्याला पकडले....मी या प्रकरणात प्रथम वृत्तान्त लिहवला, तो अभियोग प्रदर्श क्रमाक ६५ आहे त्यावर माझी सही आहे.' (संदर्भ छापील पुस्तक क्रमाक १ पान ५१).

अभियोग प्रदर्श क्रमांक ६५ मधून :–

'...सुमारे पाच वाजून दहा मिनिटे झाली. त्या वेळी संध्याकाळी महात्माजी बिर्ला भवनातून प्रार्थना-प्रांगणात जायला निघाले.... (प्रार्थनाप्रांगणाच्या) चवुतऱ्यावर ते सहा-सात पावले चालले. इतक्यात एक मनुष्य–ज्याचे नाव मागाहून कळले त्याप्रमाणे नथूराम विनायक गोडसे, राहणार पुणे, होते–पुढे आला....त्या (गोळ्या) महात्माजींच्या पोटात व छातीत लागल्या....रक्त बाहेर यायला लागले. महात्माजी 'राम राम' म्हणत खाली कोसळले....!'

सही : एन. एल. मेहेता.

अभियोग प्रदर्श क्रमाक ६६ मधून :–

'मृत्यूचा वृत्तान्त–हिंसेने अनैसर्गिक मृत्यू'

.....................................

.....................................

.....................................

सही : जसवन्तसिंग

डी. एस. पी., नवी दिल्ली

३०-१-४८, संध्याकाळी ६ वाजून गेल्यावर

'श्री. ब्रिजकिशन पुत्र बनारसीदास, राहणार बिर्ला भवनने विचारल्यावर नंदलाल मेहेताचे समर्थन करीत सांगितले.... मीसुद्धा नेहमीप्रमाणे महात्माजींबरोबर प्रार्थनाप्रांगणात जात होतो....महात्माजी 'राम राम' म्हणत खाली कोसळले....'

सही : ब्रिजकिशन.

अतोऽहं ब्रवीमि। दिसते तसे नसते. जसा सुरुंगाच्या दारूभरल्या विटेचा बॉम्ब केला, तसेच 'राम राम'चे 'हे राम!' केले गेले. ही काँग्रेसी प्रसिद्धी खात्याची गोबेल्सछाप दडपेगिरी!

## १५ ऑगस्ट १९४८ चा स्वातंत्र्यसोहळा!

त्या दिवशी स्वतंत्र भारताचा पहिला वाढदिवस होता. दिल्लीमध्ये सकाळपासून आकाश ढगाळलेले होते. मधूनमधून पावसाची सरही येत होती. म्हणून लाल किल्ल्यामधले ध्वजारोहण पहायला जाण्याचे टाळले. सकाळी हिंदूमहासभा भवनाच्या प्रांगणात निर्वासित मुलींच्या शाळेने साजरा केलेला ध्वजवंदनसमारोह पाहून मन प्रसन्न झाले. पांढऱ्याशुभ्र सलवारी, त्यावर आकाशी निळे खमीस आणि खांद्यावर तलम स्वच्छ दुपट्टे घातलेल्या सुस्नात मुलींचे सुरेल स्वरातले वंदे मातरम् ऐकून कान तृप्त झाले!

पण दुपारी कुठली बुद्धी झाली कोण जाणे! तिसऱ्या प्रहरी चार वाजता दिल्ली नगरपालिकेच्या वतीने लॉर्ड माउन्टबॅटन ऑफ बर्मा, भारताचे मावळते गव्हर्नर जनरल यांना मानपत्र दिले जाणार होते. मी लॉर्ड माउन्टबॅटन या व्यक्तीला प्रत्यक्ष पाहण्याच्या इच्छेने चांदणी चौकात जायचे ठरवले कुतुबरोडच्या बाजूने जुन्या दिल्लीत गेलो. चांदणी चौकाजवळ लोकांची तोबा गर्दी होती. ऊन चटकत होते. मनस्वी उकडत होते. त्यातच गर्दीचा उकाडा! घामाने निथळत होतो तरी पुढे घुसून राजप्रतिनिधींना पाहता येईल अशा जागी जाऊन उभा राहिलो. थोड्याच वेळात व्हाइस रीगल लॉजची दोन घोड्यांची फैटन आली. त्यात नेव्ही अॅडमिरलचा शुभ्र गणवेश घातलेले लॉर्ड माउन्टबॅटनमहाराज, एका बाजूला लेडी एडविना माउन्टबॅटन व दुसऱ्या बाजूला वडिलांसारखीच थोराड पॅमिला माउन्टबॅटन बसली होती. त्यांच्या पायथ्याशी

झेंडूच्या फुलांच्या हारांचा खच साचला होता. लोक पुढे घुसून खाशा स्वाऱ्यांना हात लावायचा प्रयत्न करीत त्यांच्यावर फुले उधळत होते. मौन्टबॅटन पती-पत्नी हसऱ्या चेहेऱ्याने सर्व सहन करीत होती. पॅमिला तर चक्क खिदळतच होती ! फॅटणीच्या पाठीमागल्या पायदानावर साव्हा रीगल लॉजचे दोन स्वार उभे होते. मधल्या दांड्यावर एक गाधीटोपी घातलेला कार्यकर्ता घसा खरवडून ओरडत होता, 'पण्डत मौन्टबॅटन आफ बरमावाले की जय हो !' त्याला लोक प्रतिसाद देत होते. ऐकायला येत होते, 'पण्डत मटनबिटन औ बिरयानीवाले की जय हो !'

कुणाही भारतीयाला मान खाली घालायला लावणारे ते स्वतंत्र भारतवासीयांचे 'उत्स्फूर्त' वागणे बघून मी डोळे मिटून घेतले होते ! तशाच स्थितीत जमिनीवर पाय टेकायला न मिळता खारी बावलीच्या रस्त्यावर मी कधी नि कसा ढकलला गेलो ते कळलेच नाही ! दुसऱ्या दिवशीच्या भारतीय समाचारपत्रातून आठ स्तंभी मथळे होते, 'राजप्रतिनिधी मौन्टबॅटन को भावभीनी बिदाई !'

मनाची ग्लानी सुटी संपली तरी गेली नव्हती. दोनतीन दिवसांनी रस्त्यावरच्या दुकानांतून शंकर्स विकलीचा त्या आठवड्याचा अंक घेतला. त्यात लेख होता, 'एक वर्ष होऊनसुद्धा भारतात स्वातंत्र्य कोठे दिसले नाही ! ते दिसले होते केवळ परदेशातून उघडण्यात आलेल्या निरनिराळ्या वकिलातीमध्ये दिल्या गेलेल्या जल्लोषी कॉकटेल पार्ट्यांमधून !'

## अंबाल्याचा अंधार !

दिनाक २७।४।१९४९ ला सकाळी नऊ वाजता मी अंबाला येथील केन्द्रीय, बंदीगृहात पोचलो. तेथे जाताच मला ताबडतोब फाशीची शिक्षा झालेल्या बंद्यांना ठेवायच्या कोठड्यांच्या इमारतीकडे नेण्यात आले. तेथे इमारतीच्या उजवीकडल्या पहिल्याच कोठडीच्या दारासमोर उभ्या असलेल्या बंदुकधारी पहारेकऱ्याने दाराच्या लहानशा छिद्राचे झाकण बाजूला सारून आत बघितले व लगेच दाराचे कुलूप काढून दार उघडले. मी आत गेलो तो भाग सुमारे आठ फूट बाय सहा फूट क्षेत्रफळाचा, जमिनीवर दगडी फरशी केलेला, चारी बाजूनी दगडी भिंतीनी वेढलेला असा होता भिंती सुमारे बारा ते चौदा फूट उंचीच्या असाव्यात. धाब्याच्या छताच्या मध्यभागी अठरा इंच बाय अठरा इंच लांबी-रुंदीच्या, लोखंडी सळयांची जाळी बसविलेला एक चौरस झरोका होता. दर्शनी दाराच्या डाव्या बाजूला भिंतीमध्ये एक पाण्याचा नळ होता व एक शौचगृह होते. ते कुलुप लावून बंद केलेले होते. समोरच्या भिंतीला लागून फरशीपासून दीड फूट उंचीवर सहा बाय सहा फुटाची एक खोली होती. या खोलीचे अडीच फुटी दार लोखंडाच्या चौकटीत उभ्या सळया बसविलेले असे, आतल्या माणसाच्या हालचाली दाखविणारे होते. त्या खोलीत दारासमोरच एका बाजूला घोंगडीचा व माजरपाटाच्या जाड चादरीनी झाकलेला बिछाना होता. आत एक-दोन उंच चौरंग-स्टुले असावीत. दाराच्या डाव्या बाजूला कोपऱ्यात रात्रीसाठी मलमूत्र-विसर्जनाची भांडी असावीत. रोज दुपारी छतातल्या झरोक्यातून उन्हे आत येण्याच्या वेळी संध्याकाळी बंद्याला बाहेरच्या दालनात आणले जाई व ते उन्हे अंगावर घेण्याकरिता संध्याकाळच्या चहलकदमी-शतपावलीकरिता, असे कळले. बाहेरच्या मोकळ्या वातावरणात फाशीच्या बंद्यांना अत्यावश्यक कारणाशिवाय बाहेर आणण्याची नियमानुसार मनाई होती. म्हणून मला वकिलालाही बंद्याला परामर्श देण्यासाठी त्या मृत्युदंडित बंद्याच्या कोठडीमध्ये आपल्या पक्षकाराबरोबर बसावे लागले होते. मी दालनात येताच दारावरच्या पहारेकऱ्याने आत येऊन दर्शनी दार आतून बंद करून त्याला कुलुप घातले आणि तो दारापाशी बंदूक हातात धरून पहाऱ्यावर दक्ष उभा राहिला ! असा पहारा दिवसाचे चोवीस तास मृत्युदंडित बंद्याच्या कोठडीवर ठेवण्यात येई, असे मला सांगण्यात आले !

सकाळचे साडेनऊ वाजले होते. मी स्वतः बाहेरच्या मोकळ्या, जीवनदायी झुळकानी उत्फुल्ल झालेल्या वातावरणातून आलेला, पण फाशीच्या बंद्यासाठी तयार केलेल्या त्या भयाण अंधाऱ्या दगडी कोंडवाड्यात बंदिस्त होताच थिजून गेलो ! — कसाईखान्यात बांधून ठेवलेल्या बकऱ्यासारखा संज्ञाहीन झालो होतो ! काही वेळ माझ्या तोंडून शब्दच उमटेना ! खोलीचे दार उघडल्यावर बाहेर येत असलेल्या नथूरामच्या मुखावरचे प्रसन्न स्मित बघताच, मी 'एक माणूस' हे मला जाणवले आणि त्याला हसतमुखाने आपल्याजवळ बसविले !

## नथूरामचा समारोप—१२।५।१९४९

'मी फाशीच्या शिक्षेविरुद्ध मुळीच अपील केले नाही.

पुढला मुद्दा असा की, दयेचा काही प्रश्न उभा रहात नाही आणि ते माझ्या सदसद्‌विवेकबुद्धीच्या विरुद्ध आहे. ज्यांना मी मारले, त्यांना जर मी काही दया दाखविली नाही, तर मला दयेची आशा बाळगण्याचा काही अधिकार नाही. परंतु मला येथे विनंती करायची आहे की, जर काही संभावना असेल तर—महाराज ! आपल्या अधिकारात असेल तर आणि आपण तशी शिफारस करू शकाल तर, मला शक्य तितक्या लवकर फाशी द्यावे, किंवा मला उघड्या चौकात फिरू तरी द्यावे. कारण मला ज्या स्थितीत ठेवले आहे, त्यामुळे ही हळूहळू वध करण्याची शिक्षा आहे. ही रानटी शिक्षा आहे. ही कोणत्याही सुसंस्कृत राष्ट्राची शिक्षा नाही.

'महाराज ! आपणाप्रति माझी कृतज्ञता शब्दात बोलून दाखविणे माझ्या शक्तीपलीकडचे काम आहे. मी गावंढळ मनुष्य आहे हे मला माहीत आहे. आपण महाराजानी मला बोलायला पूर्ण संधी दिली आहे.मी किती वेळा मार्गावरून भटकलो असेन कुणास ठाऊक ! महाराज, मी आपल्या सौजन्याचा अंत पाहिला असेल. तरी पण महाराज, आपण मला हटकले नाही. माझी कृतज्ञता व्यक्त करणे माझ्यापलीकडचे आहे.

'तरी असेही आहे की, या अभियोगपर्वात कदाचित केवळ इतिहासामध्येच बचाव पक्षाच्या अभिभाषकांनी दाखविलेल्या धैर्यासाठी काही ओळी मिळतील. आम्ही महात्मा गांधीच्या हत्याऱ्यातर्फे पक्षसमर्थन करणार आहोत असे उभे राहून म्हणणे ही काही थट्टा नव्हती. त्या महान देशभक्त भोपटकरांबद्दल मी माझी कृतज्ञता बोलून दाखवितो.

'मी अॅडव्होकेट जनरलमहोदयाच्या विद्वत्तेपुढे, अनुभवापुढे,

चातुर्यापुढे मान लववितो. ज्याला फाशीची शिक्षा झाली आहे, अशा माणसाबरोबर वादविवाद करणे, त्याच्यासारख्या पदावर• असलेल्या माणसाला अवघडून टाकणारे आहे. जर मी त्याना यदाकदाचित् दुखविले असेल तर मला फक्त एवढेच म्हणावयाचे आहे की, मला माझे कर्तव्य करावयाचे होते. मला त्यांच्याविरुद्ध कसलीही व्यक्तिगत ईर्षा नाही. मला माफीच्या साक्षीदाराबद्दल द्वेष नाही. मला आरक्षी अधिकाऱ्याविरुद्ध काही असूया नाही. माझे सगळे काही म्हणणे आहे ते ज्यांनी माझ्या मातृभूमीला खंडित केले आहे त्या लोकांविरुद्ध !

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे ।
त्वया हिंदभूमे सुखं वर्धितोऽहम् ।
महन्मंगले ! पुण्यभूमे ! त्वदर्थे ।
पतत्वेष कायो ! नमस्ते ! नमस्ते !॥
( सदा वत्सले मातृभूमे नमी मी ।
त्वया हिंदभूमे सुखे वाढवीलो ।
महामंगले पुण्यभूमे तुला मी ।
सर्मपित काया, नमी मी, नमी मी ॥ )

## न्यायालयाची मानमर्यादा !

नथूराम 'अखंड भारत'च्या ध्येयाविषयी किती तीव्रपणे भावनाशील होता हे मला वारंवार पहायला मिळाले होते. भारतभूमीच्या खडित होण्यामुळे त्याचे हृदय किती व्यथित झालेले होते हे त्याच्या लिखित आणि मौलिक निवेदनामधून लाल किल्ल्यातच दिसले होते; तरी पण न्यायालयामध्ये उभे राहून मूठ आवळून 'अखंड भारत अमर रहे' अशी घोषणा उच्च स्वराने कोणीही देणे माझ्यासारख्या वकिलाला आवडले नव्हते. लाल किल्ल्यामध्ये याविषयी मला काही बोलण्याची वेळच आली नव्हती; पण अपिलाच्या तयारीसाठी म्हणून मी दिनांक २७–४–४९ ला अंबाला केंद्रीय बंदीगृहात नथूरामला भेटलो नि अपिलाविषयी त्याला पुष्कळशा कर-न-करीच्या सूचना दिल्या होत्या. त्यामध्ये मी त्याला म्हटले होते की, बचावपक्षाचे भाषण देताना किंवा देऊन झाल्यावरही न्यायालयासमोर किंवा न्यायालयाच्या आवारातही घोषणा देऊ नयेत. समारोपाची वाक्येदेखील प्रार्थनेच्या शब्दात म्हणावीत. न्यायालयात उच्च स्वराने आव्हानात्मक घोषणा देणे न्यायालयाला अवहेलनात्मक आहे. न्यायालयाची मर्यादा सर्वांनीच पाळायला हवी !

माझे म्हणणे नथूरामने मुकाट्याने ऐकून घेतले. त्यावर तो काहीच बोलला नाही

सिमला येथे नथूरामचे भाषण अकस्मातच दिनांक ५–५–४९ ला सुरू झाले व ते मे महिन्याच्या ५, ६ व ९, १०, ११ ला दिवसभर चालले. त्या संपूर्ण भाषणात त्याच्या तोंडून उत्तेजित अथवा घोषणात्मक असे काही बोलले गेले नाही दिनांक १२ मेला त्याने समारोपाचे भाषण केले त्या वेळीसुद्धा त्याचे भाषण भावनोत्कट झाले; पण आग्रही मुळीच झाले नाही आणि संभाषणाच्या शेवटी त्याने 'अखंड भारता'ची घोषणा म्हटली नाही, 'वंदे मातरम्' नाही, 'जय हिंद'सुद्धा म्हटले नाही ! त्याऐवजी नथूरामने 'नमस्ते सदा वत्सले मातृभूमे'चे चारी चरण हात जोडून सुरेल स्वरात गाइले. 'त्वदर्थे पतत्वेष कायो ! नमस्ते ! नमस्ते !' अशा काही हृदयग्राही स्वरात म्हटले की, न्यायालयामधला श्रोतान्श्रोता गदगदून गेला आणि पूर्ण श्लोक म्हणून झाल्यावरही त्याचे नमस्ते, नमस्ते म्हणत सर्वांना अभिवादन करणे आणि खाली बसल्यावरही त्याचे नतमस्तक नि अधोदृष्टी ठेवून स्तब्ध बसणे कुणालाही चटका लावणारे ठरले !

## सिमल्याचे श्रोते

नथूराम आपल्या भाषणाचा समारोप करीत आहे हे श्रोतृवर्गाच्या लक्षात येताच त्यांची सहानुभूती ओसंडायला लागली होती. आपल्या पाच दिवसांच्या भाषणात दाखविलेल्या निरिच्छ व निरहंकारी तशाच उदात्त नि गंभीर वृत्तीने त्याने श्रोत्यांची मने जिंकली होती. अशा स्थितीमध्ये त्याने समारोपाचे भाषण बोलायला सुरवात करताच श्रोतेमंडळी गलबलून न जाती तरच नवल ! विशेषतः नथूरामने आपल्या पाच दिवसाच्या मनस्थितीचा उल्लेख करून म्हटलेले शब्द, 'मी हे कधी विसरू नये की, मी फाशीची शिक्षा झालेला मनुष्य आहे. माझ्यासारख्याच्या शब्दांना आपण कितीशी किंमत द्याल ?' ऐकताच श्रोत्यातल्या एका महिलेने काढलेला गद्गदोद्गार 'हाय री मेरी मैया !' साऱ्या महिलांचे बांध फोडून गेला ! पुढे नथूरामचे सगळे भाषण संपेपर्यंत महिलांनी काय करायचे उरले होते ? त्या आपल्या पदराची किंवा दुपट्ट्याची टोके तोंडात कोंबून आपले हुंदके आवरीत आपले ढळाढळा ओघळणारे अश्रू भिजलेल्या रुमालानीच टिपीत होत्या ! पुरुषवर्ग आपल्या गालांवर ओसंडणारे आसू हातरुमालाने पुसत एकमेकांकडे व नथूरामकडे बघत होता. न्यायमूर्तीगणही एखाद्या तंद्रीतून स्वतःला बाहेर काढीत असल्यासारखे आपल्या समोरचे कागद वर-खाली करीत होते. माननीय मुख्य न्यायमूर्तीमहोदय थोड्या वेळाने म्हणत होते, 'आता कोण आरंभ करणार ? काय सिस्टर बानर्जी ?'

## बहिणीने दिलेला स्वेटर

दिनांक १२ मे १९४९ ला सिमला उच्च न्यायालयातले नथूरामचे भाषण सकाळी बाराच्या सुमारास संपले होते. विश्रांतिमध्यंतरात त्याला विश्रांतीकक्षाकडे नेले जात असता लोकांनी दोन्ही बाजूनी गर्दी केली होती. त्या गर्दीतूनच एक तरुणी नेटाने पुढे येऊन आमच्या पाठोपाठ विश्रांतिकक्षाच्या दारात येऊन उभी राहिली. तिच्या हातात कागदात गुंडाळलेले काही दिसले. बंदीपाल अधिकाऱ्याने 'काय आहे ?' असे म्हटल्यासारखे तिच्याकडे भुवया उंचावीत पाहिले. तेव्हा त्या मुलीने खोलीमध्ये पाऊल टाकले. त्या पुडक्यामधून एक लोकरीचा स्वेटर बाहेर काढीत तिने इंग्रजीमध्ये म्हटले, 'मी हा स्वेटर याच्यासाठी गेले सात दिवस कोर्टामध्ये याचे भाषण ऐकताना व घरी बसून विणला आहे ! तो यानी घ्यावा नि वापरावा अशी माझी नम्रपणे हार्दिक इच्छा आहे !' मृदु स्वराने बोलत तिने त्या अधिकाऱ्यापुढे तो स्वेटर धरला. त्या मुलीला अधिकारी ओळखत असावेत. अधिकाऱ्याने नथूरामकडे बघितले. त्याच्या प्रसन्न मुद्रेवरचे स्मित बघून

अधिकाऱ्याने स्मित मुखाने त्या मुलीला पंजाबीत म्हटले, 'ठीक है रक्खो !' मी तिच्याजवळून तो स्वेटर घेतला. तेव्हा नथूराम त्या मुलीला इंग्रजीमध्ये म्हणाला, 'या ताई ! किती चांगली आहेस ग तू ? ताई, तुझे नाव काय ते तरी भावाला साग !'

त्या मुलीने तोंडाने काही न बोलता हात जोडून नाथूरामकडे वर मान उचलून बघितले नि तिचे डोळे भरून आले ! तिने चटकन मान खाली करून नथूरामला नमस्कार केला आणि त्याचे 'खूप खूप धन्यवाद हं ताई !' ऐकत मागे वळून ती जड पावलांनी खोलीबाहेर निघून गेली ! नथूरामने लगेच गंभीर होऊन बंदीपाल-अधिकाऱ्याकडे बघितले. त्यांनी नथूरामला त्या मुलीचे नाव, कुणाची मुलगी, काय करते वगैरे सांगून तो स्वेटर नथूरामजवळ दिला आणि त्याला अंगात घालायला विनंती केली. त्याने तो घेऊन तेथेच अंगात घातला नि प्रसन्न मुद्रेने स्वतःच्या अंगातल्या स्वेटरवर हळुवारपणे हात फिरवीत म्हटले, 'किती उबदार, किती मऊ, किती बरोबर माझ्याच मापाचा विणला आहे या पोरीने !'

त्यानंतर दर दिवशी नथूराम तो स्वेटर घालूनच कोर्टात आला होता !

## सिमला येथील कढाप्रसाद

एका रविवारी संध्याकाळी सिमला येथील एका लाहोरहून निर्वासित होऊन आलेल्या रईस पंजाबी शिख कॉन्ट्रॅक्टरमहोदयांकडे आम्ही चहाला जमलो होतो. बरीच मंडळी होती. कॉन्ट्रॅक्टरमहोदयांकडे आतिथ्य करायला त्यांची प्रौढ मुलगी होती. स्वतः कॉन्ट्रॅक्टरसाहेब गंभीर नि मितभाषी वाटले. ती मुलगीच सर्वांना हवे-नको विचारून आग्रहही करीत होती. मी चहाच्या कपाशिवाय इतर कशाला हात लावला नाही, हे बघून तिने त्याबद्दल मला विचारले. मी स्वतःच्या प्रकृतीमुळे काही खात नव्हतो, म्हणून तिला थँक्स म्हणत सांगितले,

'मुझसे यह चीजें खाई नहीं जाती !'

परंतु तिने माझ्या मराठी हिंदीचा काय अर्थ लावला कोण जाणे ? क्षणभर माझ्याकडे बघून ती हळूच म्हणाली, 'जिनके लिये दुआ मांगी गई है, उनको प्रशाद का थाल कभीका पहुँचा दिया है ! आप भी थोडा प्रशाद लीजिये !'

## माझा खादीचा मुखवटा

महात्मा गांधी हत्याअभियोगाचे पर्व संपल्यानंतर मी पहिल्यांदाच महाराष्ट्रात आलो होतो. त्या वेळी एका नातेवाइकांना भेटण्यासाठी मी पेण येथे गेलो होतो. त्यांच्या घरी दोन मुले होती; मोठा नऊ वर्षांचा आणि धाकटा सहा वर्षांचा. दोघेही पाहुण्यांच्या सरबराईत तैनात झाली होती. माझ्या स्नानासाठी पाणी काढून देता देता त्या दोघांमध्ये कुजबुजत बोलणे झाले.

दादा – 'ए नान्या, पाहुण्यांशी जरा जपूनच बोल हं !'

नाना – 'का रे ? कुणी पुलिसवाले आहेत, का रे ?'

– 'नाही रे; पण खोतांचा अण्णू सांगत होता की, तुझे पाहुणे गांधींच्या खुनात होते म्हणून !'

– 'बाप रे ! आता मग ?'

– 'भिऊ नको रे ! मी त्याला सांगितले की, आमचे पाहुणे खादी घालतात म्हणून; पण तो ऐकेच ना ! तो म्हणतो, त्याने काय झाले ? खादी घालणारेसुद्धा गांधींच्या खुनात होते ! आपल्या इथले पुढारी नाही का खादी घालत ? पण तेसुद्धा गांधींच्या खुनातलेच ! असे तो म्हणतो.'

– 'मग रे ? पण तू खोतांच्या अण्णूकडे गेलास कशाला मरायला ?'

– 'अरे, पाहुण्यांनीच पाठवले होते मला, पाहुण्यांना पेण कटलरीमधून सुऱ्या विकत घ्यायच्यात, म्हणून विचारायला गेलो होतो. अण्णू खोत तिथं काम करतो ना ?'

– 'म्हणजे ? पाहुणे अजूनसुद्धा गांधी-खुनाचे काम करणार आहेत की काय ?'

– 'हात् रे बावळ्या !'

माझे स्नान होईतोवर दोघेही मुकाट्याने आपली कामे करीत होती. धाकटा नाना भुवया उंचावून नि कपाळाला आठ्या घालून माझ्याकडे लक्ष ठेवून होता. स्नान झाल्यावर पाटावरचे माझे धोतर उचलून घ्यायला मी धाकट्याला सांगितले. तसे त्याने माझ्या खादीच्या धोतरावर हात फिरवीत एक भुवई उंचावून मला हळूच विचारले, 'पाहुणेकाका, तुम्ही तिरंगीचे की भगवीचे ?'

☐


# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी

लेखक : पु. ल. इनामदार

मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०.

## टॉलस्टॉय–एक माणूस : एका ग्रंथाची जन्मकथा

पृष्ठ ४ वरून

परस्परविरोधी विधानं वाचण्यात आली की, सरळ साधनग्रंथापर्यंत धडक मारावी लागली, अन् सत्य पारखून घ्यावं लागतं.'

'साधनग्रंथ म्हणजे काय बोवा ?'

'असं काय नाना, तुम्हाला तर सारं माहीत आहे ! उगीच सून-बाईची परीक्षा पहायची तर लहर आली नाही ना ?'

'छे छे– तसं नाही; पण साग तरी !'

'आत्मचरित्रात्मक मजकूर, दैनंदिन्या, पत्रं, स्मृतिग्रंथ, मुला-मुलींनी व शेजारपाजाऱ्यांनी लिहिलेल्या आठवणी, समकालीन लेखकांनी लिहिलेल्या आठवणी, इतर समकालीनांच्या दैनंदिन्या, तत्कालीन प्रसिद्ध व्यक्तींची चरित्रं, त्या देशाचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास इत्यादी, इत्यादी...'

'अरे बाप रे ! म्हणजे मोठ्ठाच व्याप आहे हा ! तू केलास तरी केव्हा ? तुझी प्रकृती तर धड नसते !'

'म्हणूनच तर हा व्याप जमला ! दिवसेंदिवस त्या व्यापात इतकी गुरफटत गेले की, रोगाकडे संपूर्ण दुर्लक्षच झालं ! खूप ट्रीटमेंट झाली, स्पेशलिस्टस् झाले, हॉस्पिटल्स् झाली...अन् सर्वांनी हात टेकल्यावर मला या अभ्यासाने हात दिला ! धुगधुगत्या आयुष्याला अर्थपूर्ण प्रयोजन दिलं ! डोक्याला सतत व्यवधान पुरवलं !'

'म्हणजे डॉक्टरी उपायांपेक्षा अभ्यास प्रभावी आहे, असं का तुला म्हणायचंय ?'

'नाना, मी असं म्हटलं, तर कुणाचा विश्वास बसायचा नाही; पण ती वस्तुस्थिती आहे !'

'छान ! पण काय ग, हे संदर्भग्रंथ तुला मिळाले तरी कुठे ?'

'युनिव्हर्सिटी लायब्ररी, पेटिट्, एशिॲटिक् या ठिकाणांहून भरपूर संदर्भग्रंथ मिळाले. काही परदेशातून मागवले !'

'ते कसे काय ?'

'असली कामं आपले 'इंटरनॅशनल' दीक्षित अगदी तत्परतेने करतात. त्यांनी मला प्रथम टॉलस्टॉयवरील प्रकाशनांची यादी पाठवली. ती इतकी प्रचंड होती की, मी अगदी दडपूनच गेले. हे लक्षात आलं की, जगाच्या कानाकोपऱ्यातून टॉलस्टॉय या व्यक्तीचा अभ्यास होतो आहे. पाश्चात्य देश या बाबतीत आघाडीवर आहेत; पण चीन, जपान इत्यादी पौर्वात्य देशानाही टॉलस्टॉय या व्यक्ती-विषयी व त्याच्या वाङ्मयाविषयी जबरदस्त आकर्षण आहे !'

'अन् आपल्याकडे ?'

'भारतीय भाषांतून टॉलस्टॉयविषयक जेवढं लिखाण झालं आहे, त्याची अद्ययावत् सूची श्री. प्रभाकर पाध्ये यांच्या संपादत्वाखाली प्रसिद्ध झालेली आहे, त्याचा मला खूपच उपयोग झाला.'

'काय ग, टॉलस्टॉयवर मराठीतही लिखाण असेलच की. चरित्र वगैरे...'

'चरित्र आहे, पण ते १९१९ मध्ये प्रसिद्ध झालेलं आहे. त्या वेळी टॉलस्टॉयच्या दैनंदिन्या, पत्रं, इतरांच्या आठवणी, पत्नीची दैनंदिनी इत्यादी मूलभूत साधनग्रंथसुद्धा इंग्रजीत भाषांतरित झालेले नव्हते अन् जे झाले होते ते त्या लेखकापर्यंत पोहोचलेले नव्हते. त्यामुळे त्या सांकेतिक चरित्रात जिवंत व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण अभाव आहे. तथापि मराठीत पुस्तक आहे हीच गोष्ट विशेष म्हणायला हवी.'

'का बरं ? त्यात विशेष ते काय ?'

'वा ! त्यामुळे आपली भाषा 'सुसंस्कृत' ठरण्यास थोडी-फार तरी मदत नाही का झाली ?

'मी नाही समजलो, भाषेच्या सुसंस्कृतपणाचा इथे काय संबंध ?'

'नाना, अगदी निकटचा संबंध आहे. टॉलस्टॉयची सर्वांत धाकटी मुलगी आहे ना, तिनं आपल्या वडिलांचं एक सुंदर चरित्र लिहिलं आहे–The Life of my father ते वाचीत असताना तिचा एक शब्दप्रयोग मला जरा खटकला. वडिलांच्या चरित्रातील काही विशेष प्रसंगांविषयी किंवा साहित्याविषयी उल्लेख करताना ती म्हणते... 'This is translated in all the civilized languages...किंवा This is available in all the civilized languages of the world. आता आपणा सर्व मराठी भाषिकांना आपली भाषा फारच 'civilized'वाटत असते. 'मराठाची बोल कौतुके–अमृतातेही पैजा जिंके' वगैरे ! तेव्हा आपल्या भाषेत टॉलस्टॉयवर अगदीच काही नसतं तर...'

'आपली भाषा 'uncivilized' ठरली असती असं का तुला म्हणायचं आहे ?'

'असंच काही नाही, पण काही लोकांच्या दृष्टीने तरी...'

'आलं लक्षात ! मग एक चरित्र असताना तू कशाला तो नाद घेतलास ?

'अहो नाना, ते लिखाण अपुऱ्या माहितीवर आधारलेलं आहे त्यात टॉलस्टॉय ही व्यक्ति सापडत नाही अन् त्याच्या तत्त्वज्ञानाच साक्षेपी विवरणही नाही. अर्थात तो काही त्या लेखकाचा फारसा दोष नाहीहो ! साधनग्रंथाच्या अभावी तो तरी काय करणार ? त्याने लिहिलं हेच खूप झालं !'

'अन् मग तू काय वेगळं केलंस ?'

'वेगळं म्हणजे असं की, मी काही नेहमीसारखं सांकेतिक चरित्र लिहिलं नाही. माणूस म्हणून टॉलस्टॉय ही व्यक्ति कशी होती याचा शोध घेतला आहे अन् म्हणून ग्रंथाला नावही 'टॉलस्टॉय–एक माणूस' असंच दिलेलं आहे. टॉलस्टॉयचे मुलगे, मुली, पत्नी, अनुयायी, शेजारी, समकालीन लेखक इत्यादी असंख्य लोकानी आपापल्या स्मृति-ग्रंथातून टॉलस्टॉयवर प्रकाशझोत टाकलेला आहे. जोडीला त्याचं थोडंसं आत्मचरित्रात्मक टिपण व संबंध साहित्य आहे; पत्रं आहेत. दैनंदिन्या आहेत अन् त्या सर्वांची सुसंगती लावण्याचे मला वेध आहेत.'

'पण काय ग, एखाद्या परदेशीय व्यक्तिसंबंधी लिहायचं म्हणजे जरा अवघडच काम आहे, नाही का ? कारण त्याच्या देशामध्ये त्याची काय प्रतिमा आहे...'

'ते मी जाणून घेतलं ना ! भरपूर चौकशी अन् चर्चा केली !'

'कोणाबरोबर ? भारतीय माणसाबरोबरच ना ?'

'छे छे ! रशियन माणसाबरोबर !'

'रशियन माणसाशी कशी काय ओळख काढलीस बुवा ?'

'आमच्या कॉलेजच्या संस्थापिका कु. कपिलाबेन खांडवाला यांनी माझी एका रशियन सांस्कृतिक खात्याच्या अधिकाऱ्याशी ओळख करून दिली. त्याच्याशी केलेल्या चर्चेतून टॉलस्टॉयविषयीची रशियन लोकांची मतं व इतर उपयुक्त तपशील मिळवता आला. चर्चा फक्त एकदाच केली, पण त्यामुळं विचारांना गती मिळाली.'

'तुम्ही बायका म्हणजे फार नेटाने कामं करता बुवा!'

'आणखीन एक गंमत सासते नाना! अमेरिकेत 'टॉलस्टॉय फाउंडेशन' नावाची एक सस्था आहे. मी जेव्हा संदर्भग्रंथांची जुळणी करीत होते, तेव्हा या संस्थेच्या अध्यक्षाना नवीन प्रकाशनाची यादी पाठविण्यासंबंधी विनंती करणारं पत्र लिहिलं. त्या पत्राला लगेच उत्तर आलं. ते कोणी लिहिलं असेल, ओळखा बरं!'

'काही कल्पना नाही बुवा! निक्सन्ने लिहिलं की काय?'

'छट्! खुद्द टॉलस्टॉयच्या मुलीनं लिहिलं!'

'अरे वा! कमाल झाली! बाकी आता ही मुलगी खूपच वृद्ध...'

'८९ वर्षांचं सध्या वय आहे त्यांचं! पण प्रत्येक पत्राला अगदी अगत्याने, तातडीने पत्र पाठवतात! बाकी अमेरिकन् लोकाचा हा गुण अगदी घेण्यासारखा आहे बरं का!'

'भले! टॉलस्टॉयची मुलगी – अन् तिच्या ठिकाणी अमेरिकन् गुण! हे कसं काय?'

'अहो नाना, ती गेली चाळीस वर्षं अमेरिकेतच रहाते. मग त्या मातीचा गुण येणार नाही का?'

'अस्सं होय? मग बरोबर आहे! बरं, पण त्यानी तुला असं लिहिल तरी काय?'

'त्यानी महात्मा गाधीचा आदरपूर्वक उल्लेख केला. मला काही विशिष्ट पुस्तकं वाचायला सांगितली. प्रकाशनांची यादी पाठविता आली नाही म्हणून खेद व्यक्त केला आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मला लाख मोलाच्या शुभेच्छा दिल्या! त्याचं पत्र पाहून मी इतकी विलक्षण प्रभावित झाले की, सर्व काम तडीस न्यायचं असं अगदी पक्कं ठरवूनच टाकलं. उत्साहानं टिपणं काढायला सुरवात केली.'

'अस्सं! मग तुझ्या प्रकल्पाचा आलेख तू स्वत:च तयार केलास काय?'

'पुष्कळसा केला, परंतु ते श्रेय मी एकटी घेऊ शकत नाही. प्रा. वि. ह. कुलकर्णी यानी अत्यंत सहृदयपणे मला मार्गदर्शन केलं. प्रथम त्यांनी माझी जराशी चाचणी घेतली. उत्तम, प्रमाणभूत अशा व्यक्तिरेखा मी वाचलेल्या आहेत की नाही ते पाहिलं, मला काही पुस्तकं वाचायला लावून व्यक्तिरेखाचे उत्कृष्ट नमुने दाखवून दिले. त्यामुळं सांकेतिक व साप्रदायिक चरित्रं ओलांडून पलीकडे जाण्यास मनोबळ मिळालं.'

'सूनबाई, मला वाटतं तुझं हे पुस्तक फारच मोठ झालं असणार!'

'होय ना! इतका प्रचंड तपशील मिळाला की, कितीही थोडक्यात लिहायचं म्हटलं तरी पुस्तक जरासं मोठंच झालं!'

'पण ते छापणार कोण?'

'लोकांच्या गुणग्राहकतेवर माझा विश्वास आहे!'

'ते ठीक आहे ग! पण कागद मिळत नाही, छपाई महाग...

'ते सर्व मोठे मोठे प्रश्न सतावीत असूनही श्री. माजगावकरांनी प्रकाशनाची जबाबदारी मोठ्या आनंदाने स्वीकारली आहे!'

'माजगावकर म्हणजे कोण ते...' माणूस 'वाले का?'

'होय, 'माणूस' या साप्ताहिकाचे संपादक!'

'अरे वा! फार आनंदाची गोष्ट सांगितलीस. मग आता तू पुस्तकरूपानं भेटणार म्हणायचं!'

'मी नव्हे! ...'टॉलस्टॉय – एक माणूस' हा पुस्तकरूपानं तुम्हाला भेटणार आहे. –पहा भेटतो का ते! तसा भेटीचा जिवंत प्रत्यय आला तर कळवा!'

'जरूर! अन् त्याची भेट घडली नाही तर?'

'तसंही कळवा! माझ्यापुढील काम दुसरं कोणी तरी उचलील! काही असलं तरी तुमच्या स्पष्ट अभिप्रायाचं मोल फार मोठं मानते मी!'

'ठीक आहे!'

'बरय् नाना, येते मी. फार वेळ घेतला तुमचा! नमस्कार करते हं.'

–०–०–

'खुशाल रहा बरं! –रिक्शा करून जा! आता कुठं जाणार आहेस?'

'पुणे स्टेशन–अन् तिथून थेट मुंबई! येते हं!'

'ये... आता मी वाट बघत बसतो ..पुस्तकाची!'

□

(संपादकास सूचना)

← हा मजकूर artless आहे. वगळलात तरी चालेल.

–०–०– अशी खूण केलेल्या ठिकाणीच थांबणार असालं तर शेवटी 'नमस्कार' एवढा एक शब्द घालावा.

–सुमती देवस्थळे

सुमती देवस्थळे
सह्याद्री सोसायटी
अंधेरी (पश्चिम)
मुं. नं. ५८


# टॉलस्टॉय – एक माणूस

**दुसरी आवृत्ती**

## लेखिका : सुमती देवस्थळे

**किंमत : ५५ रुपये**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

रंगभूमी

# अरे माणसा

**लोक अशी नाटकं का करतात बुवा ?**

'पुणे महानगरपालिका' या अजस्र आणि अजागळ स्थानिक स्वराज्यसंस्थेतर्फे अनेक नानाविध आणि निरुपयोगी उपद्व्याप पुणेकर नागरिकांच्या भल्याबुऱ्यासाठी चालू असतात, असा माझा इतके दिवस समज होता; पण या संस्थेच्या सेवकांची काही आणखी धडपड चालू असेल—खरं तर त्यांना तसा वेळ मिळत असेल, असं कोणी सांगितलं असतं तर मला खरं वाटलं नसतं; पण पुणे महानगरपालिका कलासंघाच्या 'नाट्यशिल्प' नावाच्या संस्थेने नुकताच 'अरे माणसा' नावाच्या तुफान विनोदी मुक्तनाट्याचा प्रयोग पुण्यात सादर केला.

पुणे मनपातील कलावेड्या सेवकांना उत्तेजन मिळावं, त्यांच्या कलागुणांना योग्य वाव मिळावा, अशा हेतूने दोन वर्षांपूर्वी या संस्थेची स्थापना झाली. गेल्या वर्षी या संस्थेतर्फे 'याला जीवन ऐसे नाव' या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. या वर्षी आणखी एक प्रयत्न म्हणून 'अरे माणसा' या मुक्तनाटकाचा प्रयोग झाला. 'अरे माणसा'चे लेखक होते कै. प्रभाकर भोसले आणि दिग्दर्शक श्री. शाम भोसले. नाटकातील लेखक-दिग्दर्शक-अभिनेत्यांपासून पडद्यामागे काम करणाऱ्यापर्यंत बहुतेक सर्व मंडळी मनपाच्या निरनिराळ्या खात्यांत काम करणारी सेवक मंडळी आहेत, ही गोष्ट या ठिकाणी उल्लेखनीय !

नाटकाच्या जाहिरातीत 'मुक्तनाट्य' आणि तेही 'तुफान विनोदी' असं वाचल्यानंतर मी जरा घाबरूनच नाटकाला गेलो होतो. नाटकाला सुरुवात झाली. ढोलक्याचा आवाज घुमायला लागला. स्टेजच्या दोन्ही बाजूंनी मुजरे घालत झब्बा-सुरवार आणि फेट्यातील मंडळी आली आणि त्यातील एका पोरगेल्या शाहिराने गण म्हणायला सुरुवात केली. माइकचा अंदाज घेऊन त्या शाहिराचा आवाज प्रेक्षकांपर्यंत नीट पोहोचायला सुरुवात होते न होते तोच गण संपला, गवळण झाली आणि 'मुक्तनाट्य' हे लोकनाट्य ऊर्फ तमाशालाच दिलेलं आणखी एक नवं नाव आहे, असं मला वाटत असतानाच मध्यंतर झालं !

बऱ्याच दिवसांत तमाशाचं दर्शन घडलेलं नव्हतंच; म्हणून मी जरा खुशमिजाजीतच परत येऊन बसलो. पडदा पुन्हा उघडला तेव्हा रंगमंचावर एक फूटपाथ पसरला होता. (हा फूटपाथ मुंबईचा) त्याच्या एका कडेला एक विजेचा खांब, त्याच्यापुढे एक पुतळा, पुतळ्याला भोवती कुंपण. फूटपाथला दोन बाजूंना रेलिंग. फूटपाथवर तीन माणसं झोपलेली—एक भिकारी, एक पॉलिशवाला आणि एक पाटीवाला. ते झोपलेले असतानाच एक पोलीस फूटपाथवरून चक्कर मारतो. तो त्या ठिकाणी असतानाच झोपेत बडबडल्याप्रमाणे पॉलिशवाला आणि पाटीवाला त्या पोलिसालाच शिव्या देतात. मग तो पोलीस एक स्वगत म्हणतो आणि त्यांचं बोलणं ऐकतो. मग त्यांना लाथा घालून उठवतो. दोघेही क्षणात आपले बोलणं बदलून त्याच्या आरत्या करायला लागतात. मग पोलीस जातो. पाटीवाला आणि भिकारी कोणत्या तरी कारणानं


अस्सल माणदेशी माती




व्यंकटेश माडगूळकर म्हणजे
माणदेशचा माणूस
मोकळा, दिलखुलास,
निसर्गाशी नातं सांगणारा...
व्यंकटेश माडगूळकरांनी
लेखन सुरु केलं आणि
मराठी साहित्याला
छान गावरान हिरवेपण मिळालं...
लेखनाइतकंच
व्यंकटेश माडगूळकरांचं
कथाकथन ऐकण्यासारखं...
त्यांच्या तोंडून त्यांच्याच कथा
ऐकताना मराठी मनं सहज फुलतात,
नकळत दाद जाते...
अशीच दाद घेणाऱ्या
"शाळेतली तपासणी, एका देवस्थानाचा जन्म, एका शेतकऱ्याच्या जीवनातील एक दिवस, वाटसरु" या त्यांच्या कथा
आता कॅसेटवर उपलब्ध.

अलूरकर म्युझिक हाउस
४, स्वप्ननगरी, कर्वे रोड, पुणे-४११ ००४. फोन ३०६६२, ३२९१०

" सर्व प्रमुख रेकॉर्डस् व पुस्तक विक्रेत्यांकडे उपलब्ध. "

स्टेजवरून निघून जातात. मग एक बाई रस्त्याने जात असताना पॉलिशवाला तिला अडवतो. दोघेजण मिळून 'तुझा अटकर बांधा ग–माझा अटकर बांधा रं' असे गाणं गातात आणि हिंदी सिनेमातील नायक–नायिकेला लाजवतील असा एक बागडू नाच करतात. ते झाल्यानंतर ती जाते. भिकारी आणि पाटीवाला परत येतात. तेवढ्या वेळात त्या ठिकाणी आणखी एक खेडवळ पागोटे हजर झालेले असते. पॉलिशवाला *त्याला* विचारतो, '*काय रे, अे पावट्या*' यावर उत्तर मिळते, 'माझे नाव पावट्या नाही, सर्जेराव आहे.' (या सुमार दर्जाचे बेसुमार विनोद संपूर्ण नाटकभर विखुरलेले आहेत.) त्यानंतर पॉलिशवाला आणि भिकाऱ्याचे भांडण होते. ते चालू असतानाच त्या फूटपाथचा दादा–जग्गूदादा त्या ठिकाणी अवतरतो. त्या दिवशी दादाचा वाढदिवस असल्याने रस्त्याने जाणाऱ्या आणखी एका बाईचा नाच होतो. मग पोलीस आल्याने दादा निघून जातो. सगळेजण झोपतात. एवढ्यात एक माणूस दबकत दबकत येऊन भिकाऱ्याला एक चिठ्ठी देतो आणि पळून जातो. (रहस्य–ढँणटणॅण्!) सकाळ होते. सगळेजण आपापल्या उद्योगाला लागतात. पॉलिशवाला एका गिऱ्हाइकाच्या बुटाला पॉलिश करीत असताना पुन्हा गाणे–'मी रामा पॉलिशवाला रं ऽऽ' (चाल–'हम काले हैं तो क्या हुआ दिलवाले हैं') गाणे झाल्यावर एक मोर्चा येतो.

या वेळेपर्यन्त मी तुम्हाला काय सांगितले होते आणि आता काय सांगू लागलो आहे, हे *माझे मलाच कळेनासे झाले आहे.* आणखी थोडा वेळ मी पुढे सांगत राहिलो तर कदाचित कपडे फाडत आणि केस उपटत गल्ली–बोळातून फिरू लागेन!

थोडक्यात 'मुक्तनाट्य' या गोडस शीर्षकाखाली मुंबईच्या फूटपाथवर राहणाऱ्यांची भीषण परिस्थिती दाखवण्याची आणि त्यात अधूनमधून नाच–गाणी आणि विनोदाद्वारे प्रेक्षकांची करमणूक करण्याची नाटकवाल्याची महत्त्वाकांक्षी योजना होती. अधूनमधून महापालिकेच्या कामकाजावर केलेल्या तिरकस टिप्पण्या वगळता ही योजना प्रत्यक्षात धुरंधर फसली!

नाटकाच्या संहितेबरोबरच नाटक सादर करणाऱ्या कलाकारांचाही या अपयशात सिंहाचा वाटा होता. पॉलिशवाला झालेले शाम भोसले, भिकारी झालेला अभिनेता आणि आणखी क्वचित जाणवणारा एखाद–दुसरा अपवाद वगळता समजून काम करण्याचे आणि रंगमंचावर वावरण्याचे भान कोणी ठेवायलाच तयार नव्हते! सगळ्या प्रकारातून मंडळींचा उत्साह, धडपड वगैरे *गोष्टी जाणवत होत्या; पण त्याचबरोबर* 'नाटक' या प्रकाराची जाण, प्रयत्न, परिश्रम वगैरे गोष्टींचा अभावही ठळकपणे दिसत होता. त्यामुळेच हे नाटक म्हणजे बेताच्या वकुबाच्या कलाकारांनी केलेला एक अतिसामान्य प्रयोग ठरला!

नाटकानंतर बराच वेळ मी 'लोक अशी नाटके का करतात बुवा?' असा प्रश्न वारंवार स्वतःला विचारत होतो. अचानक त्याचे उत्तर मला मिळाले, 'लोक अशा नाटकांना का जातात बुवा?'

□


# योद्धा शेतकरी

शेतकरी नेते श्री. शरद जोशी
यांचे व्यक्तिमत्त्व व विचार
सादर करणारे, तसेच त्यांच्या
व कै. माधवराव बोरस्ते,
श्री. प्रल्हाद पाटील,
श्री. माधवराव मोरे
इत्यादींच्या नेतृत्वाखाली
लढल्या गेलेल्या नासिकच्या
ऊस–शेतकरी–आंदोलनाचा
चक्षुर्वै सत्यं वृत्तान्त
कथन करणारे पुस्तक

लेखक : विजय परुळकर

**सचित्र आवृत्ती । पंचरंगी मुखपृष्ठ । किंमत : रुपये छत्तीस**

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.**

# संगीताचा प्रभुरामचंद्र सीताकांत सी. रामचंद्र

नवीन वर्षाचे स्वागत करणारे सूर वातावरणात तरळत असतानाच, हिंदी चित्रसृष्टीमधील एक सिद्धहस्त संगीतकार सी. रामचंद्र यांच्या सुरेल जीवन-सतारीला मृत्यूने मूक केले !

ही वार्ता कळल्यावर असंख्य रसिकाच्या डोळयांत पाणी तरारले आणि कानात, सी. रामचंद्र यांच्या किती तरी चित्रगीताचे सूर दाटून आले ! या संपन्न गीतामधून एक अजरामर गीत 'धीरेसे आजा री अँखियनमें, निंदिया आजा री आजा' हे अंगाईगीत, (गायिका-लता मंगेशकर, चित्रपट-अलबेला) त्या दिवशी माझ्या मनाच्या तबकडीवर सतत वाजत राहिले होते. सी. रामचंद्र यांची बरीच गीते, तशी 'भुलाये न बने' या त्यांच्याच सुदर कार्यक्रमासारखी रसिकांच्या अंतःकरणात कायमची वसतीला राहिली आहेत !

त्याचप्रमाणे सी. रामचंद्र हे जवळजवळ खरेखुरे भासणारे चोरनावही भारतीय सिनेसंगीत व भावगीत या क्षेत्रांमध्ये अढळपद भोगत राहील हे निस्संशय ! सी. रामचंद्र यांना लोक अण्णासाहेब, चितळकर, अण्णा अशा अनेक नावांनी ओळखतात. त्यांचे कलाकर्तृत्व ऐन भरात असताना, म्हणजे पन्नास ते साठ या काळात, त्यांच्या संगीताची खास रुची असणाऱ्या माझ्या मित्रमंडळीमध्ये मात्र सी. रामचंद्र यांचा उल्लेख रामभाऊ असा होत असे ! 'रामभाऊंचे अमके गाणे कसे घायाळ करून गेले', किंवा 'रामभाऊंनी तमक्या गाण्यात कसा कहर केला आहे' हे आमच्या रोजच्या गप्पात रंगणारे हमखास विषय ! नारायणपेठेतील एका रेकॉर्ड-लायब्ररीत बसून आम्ही रामभाऊची मधुर गाणी कितीएकदा तरी ऐकलेली आहेत !

या अलौकिक गीतखजिन्यामध्ये काय नव्हते ?

'तू छेड सखी सरगम' (सरगम)
'ये जिंदगी उसीकी है' (अनारकली)
'बलमा बडा नादान' (अलबेला)
'गया अंधेरा, हुआ सबेरा' (सुबह् का तारा)
'तू छुपी है कहाँ' (नवरंग)
'मोहोब्बत ऐसी धडकन है' (अनारकली)
'मेहेफिलमे जल उठी शमा' (निराला)

याच्यासारखी शास्त्रीय ढंगाची गाणी जशी रामभाऊंनी बाधली, तशीच हलक्याफुलक्या ढंगाची गाणीदेखील छान बांधली ! त्यापैकी काही चटकन् मनामध्ये येतात ती अशी—

'खलासी—भीमपलासी' (सरगम)
'भोली सूरत दिलके खोटे' (अलबला)
'बेचैन नजर, बेता बाजिगर' (यास्मिन)
'आजा मेरी जान, संडे के संडे' (शहनाई)
'जवानी की रेल चली जायेगी' (शहनाई)
'मेरे पिया गये रंगून' (पतंगा)
'गोरे गोरे, ओ बाँके छोरे' (समाधि)

हिंदी चित्रपटासाठी संगीत देण्यात मग्न असणारे रामभाऊ मराठीच्या वाटयास तितकेसे आले नाहीत. तरीही त्यांनी 'धूल मूल', 'छत्रपती शिवाजी', संत 'निवृत्ति—ज्ञानदेव' व 'घरकुल' या मराठी चित्रपटांना संगीत दिले. कवी कुसुमाग्रजांच्या कवितांना चाली देऊन रामभाऊंनी 'रसयात्रा' नावाचा कार्यक्रम तयार केला होता. नंतर 'गीत-गोपाल' व 'भुलाये न बने' हे रामभाऊंचे कार्यक्रम तर काल-परवापर्यंत रसिकाना आनंद देत होते !

रामभाऊ महान संगीतकार होते, त्याचबरोबर त्यांनी अभिनय, पार्श्वसंगीत, लेखन इत्यादी क्षेत्रातदेखील आपले कौशल्य प्रकट केले. 'माझ्या जीवनाची सरगम' हे त्याचे आत्मकथन अतिशय आटोपशीर, अदबशीर व रंजक उतरले आहे.

'एक सूर एक ताल' या महाराष्ट्र शासनाच्या संगीतशिक्षणविषयक उपक्रमाचे प्रमुख म्हणूनही रामभाऊंनी काम पाहिले.

भारत—चीन युद्धाच्या वेळी रामभाऊंनी 'अय मेरे वतन के लोगो' हे चिरंजीव प्रकृतीचे गीत संगीतबद्ध केले व ते लता मंगेशकर यांनी गायिले. या गाण्याने पंडित नेहरू यांच्या डोळयांत आसवे उभी केली, तसेच सर्वसामान्य माणसाच्या काळजाला हात घालून त्याच्याशी मैत्री जोडली !

रामभाऊंच्या संगीताने सगळयांशी दोस्ती केली, त्याचप्रमाणे स्वतः त्यांनी अनेक क्षेत्रांमधील मंडळीशी घनिष्ठ मैत्री जोडली. दोस्ताना, यारी, मैत्री हे रामभाऊंचे हुव्यासाचे विषय होते. दीडशे चित्रपटांना संगीत


**दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित—दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

—रा. ग. जाधव
(केसरी, रविवार, ६-१२-८१)

**आं बे ड क र भा र त**

लेखक बाबुराव बागुल
राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : वीस रुपये

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC–W 28

(Licensed to post without prepayment of postage–No. 11)

देऊन या गृहस्थांना मित्रांसाठी द्यावयास वेळ कसा रहात असे हे एक कोडेच वाटते; पण तसे होते खरे ! माझी त्यांच्याशी प्रत्यक्ष गाठ, मोजून-दोनच वेळा झाली !

एक्काहत्तर सालात, मी व 'सोबत'कार ग. वा. बेहेरे काही वृत्तपत्रीय कामासाठी मुंबईला गेलो होतो. कामे उरकता–उरकता लंचसाठी आम्ही कोटातल्या एका पंजाबी ढाब्यामध्ये गेलो. तेथे रामभाऊ, रमेश मंत्री, ग. वा. बेहेरे व मी असा योग जुळून आला ! गप्पा मारता मारता मी रामभाऊंच्या जुन्या गाण्यांचे मुखडे एकामागून एक म्हणावयास प्रारंभ केला. मला असे वाटते की, रामभाऊ काही वेळाने जरा अस्वस्थ झाले.

या काळपर्यंत म्हणजे एक्काहत्तर साली, सी. रामचंद्र या नावाचा हिंदी चित्रसंगीताशी नावापुरताही संबंध उरला नव्हता !

मैफल संपता संपता माझा हात हातात घेत रामभाऊ म्हणाले, ' तुमच्यासारखे लोक मला जिवंत ठेवत आहेत ! '

मला खूप व्याकुळता दाटून आली. एखाद्या सिंहासारखा हा राजा आदमी, रितेपणाच्या ओझ्याखाली दबून जरी गेला नाही तरी उबून गेल्यासारखा नक्की भासला !

रामभाऊंची व माझी दुसरी भेट ब्याहत्तर साली म्हणजे दोन वर्षांनी झाली.

श्री. ग. वा. बेहेरे यांच्या निवासस्थानी त्यांच्या वाढदिवसानिमित्त पार्टी होती. दोन-तीनदा फोन करून तगादा लावल्यावर रामभाऊ रात्री साडेअकरा वाजता पार्टीत शरीक झाले ! घरून निघतानाच ते ' टेक् ऑफ ' अवस्थेत असावेत ! रामभाऊ हॉलमध्ये शिरताच 'या या! 'चा एकच कल्लोळ झाला. मी जागेवरून उठून जात त्यांना उराउरी मिठी घातली. एक–दोन क्षण निरखून पहात रामभाऊ म्हणाले, ' तुम्ही चंद्रशेखर-पत्रकार ! आम्हाला जिवंत ठेवणारे ! ' या तीव्र स्मरणशक्तीने वास्तविक थक्क होऊन जायला हवे होते; पण का कुणास ठाऊक, रामभाऊंचा आविर्भाव बौद्धिक करामतीचा न वाटता जिव्हाळ्याने जपून ठेवलेला स्नेह उजळत असल्याप्रमाणे आनंदाचा, उत्स्फूर्ततेचा असा वाटला.

आज मनात येते की, या स्वरस्नेह्याची व आपली गाठ इतक्या कमी वेळा का बरे पडली ? ईश्वराने इतकी कंजुषी का केली ?

पण प्रत्यक्षात गाठ किती वेळा पडते यावर स्नेहबंध थोडेच अवलंबून असतात ? त्यातून हे बंध सुरांचे ! लयीचे ! तोडू म्हणता न तुटणारे !

रामभाऊंच्या संगीताच्या अद्वितीय यशामागे हा जिव्हाळा, हा स्नेहस्रोत असला पाहिजे. त्यांची गंभीर गाणी जितकी लोकप्रिय झाली तितकीच थिरकती, खट्याळ गीतेही रसिकप्रिय झाली ! ही किमया वाटते त्यापेक्षा फार फार अवघड आहे. पन्नास ते साठ काळामध्ये हिंदी चित्रपटगीते बऱ्याच प्रमाणात सांकेतिक व जुजबी अशी असल्याचे दिसून येईल. शमा–परवाना, दीपक-पतंगा, नदी–किनारा, मुरली–श्याम, अंधेरा-सबेरा, अशा धर्तीच्या ठरीव शाब्दिक जोड्यावर गुजराण करणारे गीत, जिवंत होऊन उठे ते सी. रामचंद्र, मदनमोहन, ओ. पी. नय्यर यांच्या जादुमय स्वरस्पर्शाने !

त्या काळी ऑर्केस्ट्रासाठी पारंपारिक व मर्यादित वाद्यमेळ उपलब्ध असे आणि मुख्य म्हणजे गायक-गायिकांचे आवाजही आजच्याइतके पॉलिश्ड असे नव्हते. देवदासछाप रडवेपणाची उदास कळा सर्व हिंदी चित्रपटगीतांवर त्या काळात असे. या सगळ्या अडचणींना तोंड देऊन, परंपरेचे भान न सोडता, गाण्यांमध्ये सफाई व जोष आणण्याचे काम सी. रामचंद्र, सचिनदेव बर्मन, शंकर–जयकिशन यांनी मोठ्या यशस्वीपणे केले. ' शोला जो भडके दिल मेरा धडके 'यासारखे भडकते गाणे, पन्नास साली लिहिले जाईल व संगीताचा आकार घेईल याची कल्पना, त्यापूर्वीच्या सिनेसंगीतावरून कधी तरी करणे शक्य होते काय' ?

सी. रामचंद्र यांनी अशा नव्या वाटा चोखाळल्या, जुन्या वाटांना साजरे स्वरूप दिले आणि भावुक, अल्लड, स्वप्नाळू, तत्त्वचिंतनात्मक व सरळ सरळ बंडखोर अशा स्वरांचा महोत्सव सतत चालू ठेवला हे त्यांचे रसिकांवर मोठे ऋण आहे.

असा हा असामान्य कलावंत, पासष्ट सालानंतर एकाएकी निवृत्त का झाला ? त्या वेळी सी. रामचंद्र यांचे वय जेमतेम पंचेचाळीस वर्षांचे असावे. तेव्हा त्यांच्या स्वरातील जादू संपली, नव्या सिनेसंगीताशी त्यांची प्रकृती जुळेना, असे काही झाले होते का ? निश्चितपणे काहीच म्हणता येत नाही; पण या साऱ्या कल्पित कारणांहून महत्त्वाचे व्यावहारिक कारण या निवृत्तीला होते, हे सर्व रसिक जाणतात. या कारणाचा ऊहापोह करून हाती काही लागणार नाही; पण एवढे निश्चितपणे म्हटले पाहिजे की, करोडो रसिकांना आनंदाच्या डोहामध्ये तरंगत ठेवणारा हा कलावंत, गेली पंधरा वर्षे असीम अशा वेदनेचा आकारण धनी झाला होता. दैवाने सी. रामचंद्र यांच्या बाबतीत फासेच असे काही विचित्र टाकले होते, सुरांचा हा सागवृक्ष बिलगू पाहणाऱ्या सुरलतांना जवळ करू शकला नाही. या असहाय्यतेचे मोल सी. रामचंद्र यांना आपले स्वतःचे सप्तरंगी सूर विकून द्यावे लागले.

ही यातना सी. रामचंद्रांनी कशी निभावली असेल ? कल्पना करवत नाही ! एवढे सारे भोगूनदेखील या मर्दाची शान तिळमात्रही उणी झाली नाही. हे कसे शक्य झाले ? सूरतालाच्या भारलेल्या भूमीतला हा एक शापित यक्ष होता, किन्नर होता – की, ज्याने आपला, प्रेमाचा शाप, शीतल अशा उटीसम आयुष्यभर शांतपणाने वागविला ! ही शांति संगीताखेरीज आणखी कशाने येणार ?

जब दिलको सतावे गम।
तू छेड सखी सरगम ॥

–चंद्रशेखर मराठे